# प्रकरण चौथे

## ॥ आकाशवेडी: आशय व अभिव्यक्ती विचार ॥

"नीहार" या काव्यसंग्रहाचे विवेचन केल्यानंतर आता "आकाशवेडी" या विचार प्रस्तुत आहे. हा काव्यसंग्रह इ.स. १९६८ साली प्रसिध्द झाला. या काव्यसंग्रहात एकूण ६९ कविता आहेत. या काव्यसंग्रहाची १] आध्यात्मिक भाव २] प्रेमभावाची विविधता ३] कुटुंबवत्सलता ४] वात्सल्यपरता ५] निसर्गाची ओढ ६] चिंतनपरता ७] देशभक्तीचे दर्शन ८] आत्माविष्कारपरता ही आशयसूत्रे आहेत या आशयसूत्रांचा क्रमाने विचार करावयाचा आहे.

आध्यात्मिक भाव हे आशयसूत्र असणाऱ्या कविता पुढीलप्रमाणे आहेत.

"दान" [पृ. १] "उदास काळोखाच्या सीमा" [पृ. ८] "दृष्टीला विसावा [पृ. १५] "नियतीच्या वाटा" [पृ. १८] "क्वचित क्वचित" [पृ. २०] "आकाशवेडी" [पृ. २४] "अर्ध्या वाटेवर" [पृ. २५] "पन्नाशीचा डोळा" [पृ. ४८] "जहाम" [पृ. २७] "ताण" [पृ. २८] "पुन्हा पुन्हा मी खोल पाहते" [पृ. २९] "शोध" [पृ. ३९], "शिल्पा" [पृ. ५१], "नक्षत्रदर्शन" [पृ. ५४] "उडते निद्रा" [पृ. ५७] "या एक्कावन्नाव्या शरदात" [पृ. ३४] "वेगळी" [पृ. ६३], "दोन" वाजून वीस मिनिटे झाली तरी" [पृ. ६४], "पुरावा" [पृ. ३१], "इतकी बेपर्वाई" [पृ. ६२] "श्रावणातल्या रामप्रहरी" [पृ. ५६] "एखाद्या वादळी रात्री" [पृ. ३३]" निळेभोर जळ खाली [पृ. ३२] "निळा पक्षी" [पृ. ७६] "एस. ओ. एस." [पृ. ६१] "थोडी उरली आहे. वाट" [पृ. ८२]

हा आध्यात्मिक भाव आगळे दान, आत्मपरीक्षणातून येणारी निराशा, सुखदुःखाचा अंदाज, श्रेयसाची ओढ, प्रेयसाकडून श्रेयसाकडे वाटचाल, अलौकिकाचा ध्यास, बदलती दृष्टी, स्थितप्रज्ञनेकडे वाटचाल, मनामनाचे मीलन

SHIVAJI UNIVERSITY LIBRARY KOLHAPUR

आत्मपरीक्षण, हरपल्या श्रेयाचा शोध, स्मृती उत्सव, संकेतांचे उपयोजन, समजूतदार पहाटवारा, स्वप्नांचा शोध, तटस्थ वृत्ती, सुखदु:खाचे द्वंद्वात्मक दर्शन, ईश्वरी अस्तित्वाचा प्रश्न, प्रियकर हेच आकाश, चिंतनसन्मुखता, निसर्गातील चैतन्यतत्त्व, श्रेयसाची मुद्रा, सुरक्षितपणा हाच शाप, मनस्विनीची जीवनधारणा या घटकांनी स्पष्ट झाला आहे.

आगळे दान :

"दान" या कवितेची नायिका ईश्वराजवळ अलौकिक दान मागते. दान जर मागायचे असेल तर ते आभाळापाशी माग म्हणजेच परमेश्वराजवळच माग, नाहीपेक्षा दान मागूच नको असे ती स्वत:ला बजावते. असे दान न मागता त्याशिवाय राहणे भाग पडले तरी चालेल. मागताना मात्र काहीतरी किरकोळ न मागता. ———————————————

सूर्य माग असेही ती बजावते. सूर्य हे तेजाचे प्रतीक त्यामुळे तिने मागणी केलेले दान हे अलौकिक व तेजोमय असेच आहे. रात्रीची ओढणी म्हणजे मरण मागितलेस तरी चालेल. त्यामुळे सगळी व्यथा संपेल अशा प्रकारचे आगळे दान मागण्यास नायिका स्वत:स बजावते आहे.

आत्मपरीक्षणातून येणारी निराशा-

ईश्वराकडे जाताना जाणवणारी निराशा कवयित्रीने "उदास काळोखाच्या सीमा" या कवितेमध्ये व्यक्त केली आहे. परमेश्वराकडे जाण्यापूर्वी कवयित्री आपल्या आयुष्याची रेखान् रेखा निरखते व अवाक् होऊन उदास असा काळा समुद्र ती पाहते. कवयित्रीस वाटते हा समुद्र मी सहज पार करेन. म्हणजेच मी ईश्वराकडे सहज जाईन. भावनांच्या, विचारांच्या स्मृतींच्या

लाटा पार करेन. परंतु निराशाच पदरी येते. ही निराशा केव्हा संपेल असा प्रश्न तिच्यापुढे पडतो.

सुखादु:खांचा अंदाज-

कवयित्रीने सुख व दु:ख या दोन भावनांचे वर्णन दृष्टीला विसावा या कवितेत केले आहे. भीतीदायक असे आयुष्यात ओढावणारे प्रसंग व या प्रसंगां--मधून सुटका होत नाही तसेच ते टाळताही येत नाहीत. दु:खाचे ओझे उरावर बाळगून रखडत जगावे लागते.सगळीकडे दु:ख आणि दु:खच जर वाटयाला येतें असेल तर त्या वेळी मिळणारे थोडे सुख मनाला खूप उभारी देते. विसावा देते.

श्रेयसाची ओढ

जीवनात श्रेयसाची ओढ ही केव्हा ना केव्हा खुणावत असते. ही ओढ जीवनातील सर्वोच्च आनंदाचा निर्देश करते.ईश्वराच्या दर्शनातच हा आनंद मिळत असतो. "नियतीचा वाटा" या कवितेत कवयित्रीने सर्वोच्च सुखाकडे जाण्याचा मार्ग अधोरेखित केलेला आहे. त्यासाठी कवयित्रीला खूप शोध घ्यावा लागला. पण जसा राजमार्ग भेटला नाही तशी पाऊलवाटही भेटली नाही. पण शेवटी एक प्रकाशरेखा दिसली.त्यावरून कवयित्रीने. वाटचाल केली. तिच्या दृष्टीने हा अग्निपथ होता. नशिबानेच आपणाला ही वाट दिली असे कवयित्रीला वाटते.

प्रेयसाकडून श्रेयसाकडे वाटचाल:

श्रेयसाची ओढ कवयित्रीला लागते;पण प्रेयसाकडून श्रेयसाकडेच वाटचाल करावी लागते."क्वचित क्वचित" या कवितेत हा भावानुभव व्यक्त झाला आहे. मंगलोरी कौलाची अंगणी, त्यातून प्रपंचाचा निर्देश करणारी

धुराची वेल, छोटीशी आग, दारच्या जुईच्या वेलीप्रमाणे विनयाने उभी असणारी सासुरवाशीण, सुखदु:खाचे आठवणारे पूर्वायुष्यातील अनुभव या सगळ्यांतून मनाला एक परिपक्वता लाभते व डोंगरवाऱ्याचा मोकळा वास मन प्रसन्न प्रसन्न करतो. त्या वासासाठी जीव हुरहुरतो. म्हणजे प्रेमाकडेच वाटचाल करावीशी वाटते.

अलौकिकाचा ध्यास;

कवयित्री स्वत:स आकाशवेडी म्हणविते "आकाशवेडी" या कवितेत कवयित्रीस अलौकिकाचा ध्यास लागल्याचे दिसते. कवयित्री म्हणते, मी एक आकाशवेडी पक्षीण आहे. दुसऱ्या कशाचेही मला भान नाही. माझ्या डोळ्यांत, श्वासात व हृदयात आकाश आहे. म्हणजेच ईश्वराचा ध्यास आहे. स्वप्ने आहेत. माझ्या स्वप्नामध्ये सकाळ तेजस्वी बनते. तर रात्र गीत गाते. माझ्या पंखांमधून दिशा बोलतात. आपण आकाशात अशी झेप घ्यावी वाटते, की ढगांमध्ये बाणासारखे घुसावे. व ढगांचे अबोली, धुरे, केशरी रंग पंखावर घ्यावेत.

पहाटेची तांबडी म्हणजे जीवनाविषयी आशावाद व्यक्त करणारी रहस्ये जाणून घ्यावीत. स्वराशी स्वर जुळतो का ते पहावे. आपल्या हृदयाची वीणा आशावादी विचारांचा सुंदर शिवस्पर्श झाल्यावर आनंदाने झणत्कारिते का तेही पहावे. एक एक अनुभव कवयित्रीला आध्यात्मिक उंची-जवळ घेऊन जातो. या अध्यात्माच्या निळ्या रंगाने ती अंतर्बाह्य निळी झाली आहे. म्हणजे तिच्या मनात सुखदु:खापलीकडचा आनंद आहे. त्यामुळे आपण किती उंच जावू, इच्छित ठिकाणी पोहचणे साधेल का, का मध्येच आयुष्य संपेल याचा तिला खेद वाटत नाही.

बदलती दृष्टी:

"अर्ध्या वाटेवर" व "पन्नाशीचा डोळा" या कवितांमध्ये कवयित्रीने निम्मे आयुष्य संपल्यानंतर जीवनविषयक दृष्टीकोन कसा बदलतो हे सांगितले आहे.

"अर्ध्या वाटेवर" या कवितेत मनुष्य अर्धे आयुष्य संपल्यावर अंतर्मुख होतो व त्याच्या आवडी- निवडी बदलतात हे सांगितले आहे. तसेच त्याला मृत्यूची ही चाहूल थोडीशी लागते. अर्धे आयुष्य संपल्यानंतर गुलमोहर आवडतो, पण तो जरा फिका असावा असे वाटते. बालपणी आवडणारे भडक रंग पुढे आवडतात असे नाही. याच वयात आपण दुसऱ्यांना पुरते ओळखू शकतो. चांगलीवाईट माणसे समजतात. पण स्वत:ला ओळखता येत नाही. याची सल राहते. कोवळ्या भावना नाहीशा होऊन त्यांना परिपक्वपणा येतो. पाय थोडे थबकतात, म्हणजेच आपण केलेले मार्गक्रमण बरोबर आहे का याचा कानोसा घेतला जातो. त्याचबरोबर मृत्यूची भीती मनामध्ये घर करू लागते. आयुष्याच्या अर्ध्या वाटेवरसुध्दा कधी-कधी असा क्षण येतो की आयुष्याची वाट नाहीशी होते.

"पन्नाशीचा डोळा" या कवितेत नंतर व्यक्तीच्या अंतरंगात कोणते बदल घडतात हे कवयित्रीने आत्मपरिक्षणातून सांगितले आहे. कवयित्री म्हणाले पन्नाशीला एक डोळा फुटतो म्हणजे प्रत्येक बाबीकडे पाह-ण्याची एक नवी दृष्टी निर्माण होते "क्ष" किरणांनी शरीर जसे तपासावे तसे प्रत्येक गोष्ट ती दृष्टी तपासते. नको ते नाहीसे करण्याची व हवे ते शुध्द करण्याची क्षमता प्राप्त झालेली असते. विचार व भावना यांच्या गुंतागुंती-तून बाहेर पडण्याचे कौशल्य पन्नाशीत प्राप्त होते. या वयात मन ओढ

होते ते आपल्या अपत्यांकडे. या वयातील समज पक्की असते. भाबडेपणा नाहीसा झालेला असतो. या वयापर्यंत अनेक सुखादु:खांचे क्षण अनुभवलेले असतात. पन्नाशीचा डोळा म्हणजे तिसरा डोळा असतो. कारण तो:

"आत्मपरीक्षेने जरासा कुजलेला।
त्याला सोबत करते एक भावना:
बेहरा व दाखवणारी, शुभ्रवसना संन्यासिनी,
फुलांना कुरवाळीत असणारी "(पृ.४८)

अशा भावनेला पाहत असतांना कधी सुख वाटते तर कधी दु:ख वाटते

स्थितप्रज्ञतेकडे वाटचाल -

"जखम" या कवितेत कवयित्री सुख व दु:ख यांच्याकडे स्थितप्रज्ञ दृष्टीने पाहते. जीवन जगत असताना अनेक आघात होतात. हे आघात पेलावेही जातात. असे परिस्थितीचे वार झेलावे, तशीच हारसुद्धा पचविली पाहिजे. ती परिस्थितीचा वार हा नकळत येतो, परंतु पराभव हा समोरून येतो व त्याची जखम मनाला सहन करता येणे अवघड असते.

मनामनाचे मीलन :

प्रियकर प्रेयसीचे मीलन हे जेव्हा मनामनाचे मीलन बनू पाहते त्यावेळी त्या मीलनाला चिंतनाचा, अध्यात्माचा रंग आपोआप मिळतो. दोघांच्याही मनात काही पूर्वग्रहाच्या निरगाठी असतात त्या निरगाठी ताण निर्माण करतात. "ताण" या कवितेत हा भाव व्यक्त होतो. हे ताण ताणू नयेत असे वाटते, पण ते ताणले जातात आणि डोळ्यांत पाणी येते. प्रेयसी व प्रियकर दोघेही अंतर्मुख होतात. मनोमीलन साधावयाचे असेल तर पूर्वग्रहाच्या निरगाठी सोडल्या पाहिजेत. याची साक्ष दोघांनाही पटते.

आत्मपरीक्षण-

पुन्हा पुन्हा मी खोल पाहते व"शोध" या दोन कवितांमध्ये कवयित्रीने केलेल्या आत्मपरीक्षणाचे वर्णन आहे.

"पुन्हा पुन्हा मी खोल पाहते" या कवितेत कवयित्रीने आपल्या अंतरंगात डोकावल्यानंतर जे दिसेल त्याचे वर्णन येते. कवयित्री जीवा-शिवाचे मीलन मूर्त रूपात पाहू इच्छिते, त्यासाठीच तर तिची सारी तळमळ आहे. मनामध्ये स्थापन केलेली परमेश्वराची मूर्ती स्थिर आहे. भावनांची ज्योतही अखंड तेवत आहे. तसेच ओठांवरील हास्यही तसेच मधुर आहे. कुठेही कमतरता आढळत नाही; पण जीवाशिवांचे दर्शन घडले नाही. त्यामुळे मन मात्र रात्रंदिवस बेचैन आहे.

हरपल्या श्रेयाचा शोध: "शोध" या कवितेत हरपले श्रेय शोधण्याचा प्रयत्न आहे. माझी माझ्यात काय हरवले आहे. याचा शोध कवयित्री घेते आहे. पश्चिमवारा झाडांमध्ये काय हरवले ते शोधतो आहे. तसेच काजवा पाठीवर दिवा घेऊन नक्की काय शोधतो आहे. हे निसर्गाचे घटक आपआपल्यापरीने शोध घेत आहेत. कवयित्रीसुद्धा स्वत:मध्ये हरपल्या श्रेयाचा शोध घेत आहे.

स्मृती उत्सव :

"शिल्प" या कवितेत कवयित्रीने आठवणींचे शिल्प चित्रित केले आहे. मनाला प्रगल्भ करणाऱ्या आठवणी ह्या पहाटेच्या वेळी येतात. पहाटेच्या वेळी अस्थिर आठवणींचे शिल्प असे कोण कोरते असे, कुणा कुणाच्या मनावर तर या आठवणींचे शिल्प चिरमुद्रित असते. पहाटेच्या प्रसन्न वेळीच अशा आठवणींचे शिल्प मनावर कोरले जाते.

संकेताचे उपयोजन -:

"नक्षत्रदर्शन" या कवितेत नक्षत्रदर्शन हा संकेत घेतला आहे. नक्षत्रदर्शन म्हणजे कवयित्री म्हणते मी नक्षत्रदर्शन करायला गेले, तेव्हा अस्तित्वाला

अंधारून टाकणारा फटक उजेड होता. उजेड उतरणीला लागतो व नक्षत्रदर्शन होते. पण पण पायांनी माप आधीच मांडलेले असते. नक्षत्र डोळ्यांत धरता येत नाही व माप पुन्हा भरता येत नाही. आयुष्याच्या अखेरीस आयुष्याचे रहस्य समजते, परंतु तेव्हा कर्तव्यही केलेले असते.

समजूतदार पहारेकरी:

पहारेक-याचा उबदार स्पर्श अस्वस्थ निद्रेचे सांत्वन करतो हा भाव "उडते निद्रा" या कवितेतून स्पष्ट होतो. ही निद्रा अस्वस्थ आहे. तिला आभाळाच्या शांतिल स्पर्शाने समाधान मिळत नाही. ती सगळीकडे फिरते आहे. ती एकटी आहे. काळ्या पडद्यामागे तिला ईश्वराची अंधुक मूर्ती दिसते आहे, पण तेथपर्यंत पोहचता येत नाही. ती काळोखाच्या हाडकावर धडका मारत फिरते आहे. ही निद्रा म्हणजे अस्वस्थ मानव आहे, पण जेव्हा कनवाळू, अनुभवी आणि जाणता पहारेकरी येतो. व तो तिला मायेने समजावतो तेव्हा ती शांत होते. आपण जीवनानुभवाचा संयमाने व शांतपणे स्वीकार केला पाहिजे हा भाव येथे प्रकट होतो.

"स्व" चा शोध

"या एक्कावन्नाच्या शरदात" या कवितेत कवयित्रीने स्वत:चा शोध घेतला आहे. वयाची एक्कावन्न वर्षे झाल्यानंतर दूर दूरच्या शिशिराची सार म्हणजेच म्हातारपणाची जाणीव होऊ लागते. तरीही तारुण्याचे स्मरण होते. तारुण्याचा बहर व घालविलेले सुवर्णक्षण आठवतात. आयुष्यात घडलेल्या वादळी घटना व आनंदमय घटनाही आठवतात. अनेक आठवणींच्या सरीने भिजून जावे असे कवयित्रीला वाटते. अजूनही पूर्वीच्याच जोमाने आयुष्याचे मार्गक्रमण चालू आहे.

## तटस्थावृत्ती:

"वेगळी" या कवितेमध्ये कवयित्री ही सुखदु:खाकडे तटस्थपणे पाहणारी एक वेगळी नायिका आपणास आढळते. कवयित्री म्हणते मी पंख असून जमिनीस खिळणारी, वेगळी अशी आहे. तर तुटलेल्या पंखांनी आकाशात झेप घेणारी मी वेगळी आहे. आपले वेगळेपण सांगताना कवयित्री म्हणते की, मी डोळे बांधूनही पाहू शकते व उघडया डोळ्यांनी पहात नाही. संतप्त वाणीला मुकी ठेवते तर नि:शब्द श्वासाचे ग्रंथ लिहिते. सुखाला सावत्र म्हणून दूर लोटते.दु:खाला सख्खी म्हणून जवळ करते. या सर्व वेगळ्यांची एका ठिकाणी भेट होते. एकमेकींकडे बघून त्या उदास हसतात व वेगळ्या होतात.मी मात्र या सर्वांहून वेगळी ती भेट पाहण्यासाठी उरते.

कवयित्री ही सुखदु:खाकडे स्थितप्रज्ञतेने पाहते व तितक्याच निर्विकारपणे ईश्वरचरणी लीन होऊ पाहते.

## सुखदु:खाचे द्वंद्वात्मक दर्शन :

सुखदु:खाचे द्वंद्वात्मक दर्शन "दोन वाजून वीस मिनिटे झाली. तरी" या कवितेत घडते.दोन वाजून वीस मिनिटे झाली तरी कवितेच्या नायिकेस झोप येत नाही. रात्र झोपेला भीती दाखवत घोंगावत येते.तिला पाहायला डोळ्यांचे धाडस होत नाही. आणि धाडस केलेच तर भीतीने झोपेला हजार डोळे फुटतात.रात्रीच्या विराट काळोखातून एकेक विश्व दिसते. अधू माणसांचे विश्व, सरपटणा-या माणसांचे विश्व, मनुष्यभक्षक माणसांचे विश्व, [illegible] भुरळी माणसांचे विश्व,तसेच चिरडलेल्यांचे व चिरडणारांचे विश्व अशी वेगवेगळी विश्वे दिसतात. व ती सभोवताली गरगरतात.चक्रावर घातल्याप्रमाणे फिरतात व त्यावेळी परक्यांचे, ओळखीचे नात्याचे व स्व:त:चे

तोंडवळे दिसतात व कासावीस झालेले मन आणि तारवटलेले डोळे एखादा आधार शोधतात की ज्याने ही भोवळ थांबेल पण असा आधार मिळत नाही.शेवटी दुःखच पदरी येते

ईश्वरी अस्तित्वाचा प्रश्न -:

"पुरावा" या कवितेत कवयित्रीने परमेश्वराच्या अस्तित्वाचा प्रश्न उभा केला आहे. परमेश्वर आहे असे मानावे की नाही असे असा विचार कवयित्रीच्या मनात येतो. परमेश्वर आहे म्हणावे तर पुरावा काय ? नाही म्हणण्याचे धाडस होत नाही. पुन्हा मनामध्ये विचार येतो तो नसता तर तीही नसती. म्हणजे श्रध्दा नसती - श्रध्दा असणे हाच परमेश्वराच्या अस्तिवाचा सबळ पुरावा आहे.

प्रियकर हेच आकाश

या अध्यात्मक भावापोटी "इतकी बेपर्वाई" (पृ. ६२) सारख्या कवितेतून प्रियकरास आकाश मानण्याची वृत्ती प्रकट होते. आपल्या प्रियकर बेपर्वाईने वागतो त्याच्या वागण्यातून कलंदर वृत्ती स्पष्ट होते.तिला वाटते की, आपली काय अथवा आपल्या प्रियकराची काय मुळे मातीतच आहेत. पण क्षणार्धात ती हा विचार बाजूला काढते. ती समजूतदार आहे.त्याचे एक रूप म्हणजे आपल्या प्रियकराच्या डोळ्यांत ती चंद्रसूर्य पाहते. आणि तोच धागा पकडून चंद्रसूर्यांना कोणाचे अश्रू दिसणार नाहीत अशी स्वतःची समजूत काढते. प्रियकराने मात्र आकाशच रहावे असे या प्रेयसीला वाटते.कारण तो जर आकाश राहिला नाही तर डोळे उघडून कोणाकडे पाहवयाचे,याचे उत्तर मिळणार नाही.थोडक्यात ही प्रेयसी प्रियकराला अलौकिक असामान्य मानते. तो ईश्वराच्या समीप आहे असे तिला जाणवते. यातूनच अध्यात्म भाव प्रकट होतो.

चिंतनसन्मुखता:

श्रावणाचा चमत्कार येथे कवयित्रीच्या चिंतनाला प्रवृत्त करतो "श्रावणातल्या समहरी" या कवितेत दोन चित्रे समोर येतात. माड, जुई-तेरडा, गुलाब, बुलबुल, पपया, साळुंकी ही निसर्गातील वनस्पती व पक्षी सृष्टी आनंदी व प्रसन्न आहे. पण तेथेच जवळ दुसरे एक चित्र आहे. तारेत वटवाघूळ अडकलेले आहे व भुकेलेला कावळा त्याला टोचा मारतो आहे. कवयित्रीला जाणवते की, वरील चित्राच्या पार्श्वभूमीवरील हे चित्र म्हणजे मखमली गालिच्यावर थूकून पडलेला शाईचा थटथटीत ठिपका आहे. ही दोन्ही चित्रे जीवनातील सुखदु:खाचेच दर्शन घडवितात. जीवनात जशी प्रसन्नता आहे तशीच क्रूरताही आहे. प्रसन्नता मनाला आनंद देते, तर क्रूरता खिन्नता निर्माण करते, आणि व्यक्तीला अंतर्मुख करते. हाच भाव या कवितेतून व्यक्त झालेला आहे. हा श्रावणाचा चमत्कार केवळ प्रसन्नता निर्माण करीत नाही; तर क्रूरतेचेही दर्शन घडवितो म्हणून त्याला चमत्कार म्हणावयाचे. एक आध्यात्मिक चिंतनपरता भावाचा घटक आहे. तो "एखादया वादळी रात्री" [पृ. ३३] या कवितेतून स्पष्ट होतो. एखादया वादळी रात्री युगायुगाची जडशिळा करकरत बाजूला होते आणि सगळ्या सती, महासती, राण्या, महाराण्या रागाने शापित गायिकेला जीवनाचा जाब विचारतात. ती फक्त आर्त, मधुर स्वराचे जाळे पसरते. हारेतर सुरांची किमयाच करते आणि सती, महासती, राण्या व महाराण्या यांच्या डोळ्यांतील रागाची फुले बनतात. त्यांच्यावर जो अन्याय झाला, त्यांना जे कष्ट सोसावे लागले त्यामुळेच तर त्यांना राग आला होता, पण या अन्यायाच्या, कष्टाच्या पलीकडेदेखील जीवन आहे. हे त्यांना गायिकेच्या सुरांनी जाणवून दिले. म्हणून त्या ओचे सावरीत यमुनेच्या

SHIVAJI UNIVERSITY LIBRARY KOLHAPUR

जळात उतरल्या, कारण यमुनेचे जळ कृष्णाच्या स्पर्शाने व त्याच्या कर्तृत्वाने पवित्र झालेले होते. त्यांच्या हातात घागर नव्हती, पण ते पवित्र जळ भरून घेण्यासाठी त्या उतरल्या होत्या; म्हणजेच तो अध्यात्माचा अनुभव त्यांना मानसिक पातळीवर घ्यावयाचा होता.

निसर्गातील चैतन्यतत्व :

कवयित्रीला निसर्गात चैतन्य तत्वाचा साक्षात्कार होतो हे "निळेभोर जळ खाली" या कवितेतुन लक्षात येते. निळ्या रंगाची कवयित्रीला ओढ आहे. दिवस-रात्र पृथ्वीवरील निळे जळ व आकाशाचा निळा रंग कवयित्रीच्या मनात खळबळ निर्माण करतो. पृथ्वीवरचा दिवस वास्तवाची व त्यातुनच वास्तवाच्या पलीकडे जाणाऱ्या चैतन्यतत्वाची याद देतो; तर रात्रीचे आकाश मंत्रमुग्ध करणारा अनुभव देते. या अनुभवात भोवतालच्या विश्वाचा, काळाचा विसर पडतो. ही मंत्रमुग्ध अवस्था किती दिवस व किती रात्री होती हे काही लक्षात येत नाही. त्यामुळे तिला इतर कशाचीच पर्वा वाटत नाही.

श्रेयसाची मुद्रा:

मनावरील श्रेयसाची मुद्रा मोजक्या शब्दांत "निळा पक्षी" या कवितेतुन व्यक्त झालेली आहे. हा निळा पक्षी म्हणजे ईश्वराच्या मनोहरी रुपाचे प्रतिकच आहे. तो अंत:करणात खोलवर जाऊन बसलेला आहे आणि तो अंत:करणात सदविचारांची नक्षी कोरतो आहे. आणि याला मनच साक्षीदार आहे. हा श्रेयसाचा विचार सारे अंत:करणच भारून टाकतो हेच खरे.

सुरक्षितपणाचा शाप

माणूस जेव्हा संकटात सापडतो तेव्हा त्यातून बाहेर येण्यासाठी तो कसा धडपडतो याचे सुरेख वर्णन 'एस. ओ. एस.'[१] (पृ. ७३) या कवितेत येते. एस. ओ. एस. म्हणजे सेव्ह अवर सोल, जेव्हा आगबोटी समुद्रावर वादळात किंवा इतर संकटात सापडत त्यावेळी एस. ओ. एस असा संदेश पाठवत

e S.O.S.- Message for help sent by radio,etc. from a ship aircraft, etc. When in danger?[२]

असा संदेश पाठविल्यावर त्या आगबोटीला लाल दिवा दिसावा आणि सुरक्षित जागा म्हणून तेथे जावे तर तो हिमनग निघावा, अशा वेळी बोटीच्या कप्तानाची जी मनस्थिती होईल ती नायिकेची झालेली आहे. कारण लाल दिवा दिसल्यावर सुरक्षित जागी जाण्याचा नायिकेने प्रयत्न केला तर ती संकटात अधिकच अडकली.

नायिका म्हणते की, आपणच जर चोहिकडून रान पेटवले असते आणि संकटात असूनही एस.ओ.एस. पाठवला असता तर त्या लाल ज्वालात हा लाल दिवा दिसला नसता आणि एस.ओ.एस. पाठवून आपण जो सुरक्षितपणाचा शाप घेतला त्यात आपला प्राण अडला नसता असे नायिकेला वाटते.

मनस्विनीची जीवनधारणा

एका मनस्विनीची जीवनधारणा व्यक्त करणारी "थोडी उरली आहे. वाट" ही कविता आहे. जीवनाच्या वाटचालीत ही नायिका स्वप्नबळ टिकवून मार्गक्रमण करीत आहे. इतर लोक टीका टिप्पणी करणारच. कोणी तिला खुळ्या स्वप्नात रंगणारी स्वप्नवेडी म्हणतात, तर ज्याचे त्याला साजून दिसते असे म्हणून कोणी तिचा गौरव करतात. या मनस्विनीने आपल्या अंतः-करणातील पवित्र आणि मंगल विचारांचे वैभव स्वप्नात उधळले. ते एवढे

दिमाखदार होते की, त्याचा स्वीकार करण्यासाठी आकाशदेखील खाली लवले. हे भाग्य कोणीही हेवा करावा असे होते. तेव्हा मनस्विनीने डोळे पुसावेत. तिचे अस्तित्व म्हणजेच एक स्वप्न आहे आणि क्षितीजा अलीकडच्या एका स्वप्नातून नकळतपणे क्षितीजापलीकडच्या दुस-या स्वप्नात जावयाचे आहे.

प्रेमभावाची विविधता हे आशयसूत्र असणा-या कविता पुढीलप्रमाणे आहेत. "गणित," [पृ. २], "ललाटरेखा" [पृ. ] "भरली ओंजळ जड होते." [पृ. ६] "आज चंद्र झाले मन" [पृ. ७], "राधा" [पृ. २२], "वैशाखमासी" [पृ. २३], "वलय" [पृ. ३७] "मनाच्या मनात" [पृ. ४०] "भेट" [पृ. ४४] "आठवत फक्त" [पृ. ४५], "तेव्हाही पण" [पृ. ४७], "स्वप्नमहाल" [पृ. ५२] "सारे शरीरच जेव्हा" [पृ. ५३] "जपायचा एकटेपणा" [पृ. ८०] "पत्र" [पृ. ५५] "सप्रेम प्रणाम" [पृ. ६४] "रात्र, अशी भिजलेली" [पृ. ६२], "ओढाळ मेघा" [पृ. ६६] "तुझ्या संगती यावया" [पृ. ७०] "आज मात्र" [ ] [पृ. ४८] "क्षण" [पृ. ५८] " त्या रस्त्यावर" [पृ. ७१]

या आशयसूत्राचे घटक प्रेमसाफल्याची ओढ, साफल्याविण उत्कट प्रेम, प्रतीक्षा करणारी प्रीती, तृप्त प्रेमभाव, श्रेष्ठ प्रेमाचे दर्शन, आतून प्रीती, हृदगत ऐकणारे प्रेम, सुरातून प्रीतीचा आविष्कार, एकटेपणा नाहीसे करणारे प्रेम, प्रेमातील अमरत्व स्वप्नमय प्रेम, सांकेतिक प्रेम, दुःखमय प्रेम, पत्रातून व्यक्त होणारे प्रेम, प्रीतीचा स्मरणोत्सव, ओढाळ प्रेम, भित्रे पण धीट होऊ पाहणारे प्रेम, प्रेमातील [illegible], सर्वकाळ टिकणारे प्रेम हे आहेत.

<u>प्रेमसाफल्याची ओढ</u>:

प्रेमाचा हिशोब मांडणारी नायिका "गणित" या कवितेत आहे. मनाची बासरी प्रेमाचे आलाप आळवीत असतानाच ती त्यामध्ये प्रेमाचे वसंतबहार

व वर्षा मिळविते, तर भावनांचे पानन पान गाळणारी पतझाड वजा करते, भाद्रपदातील सप्तरंगी भावनांचे इंद्रधनुष्य भुरूते, हे गणित मनात मांडत असताना आपल्या प्रियकराची वाट ती बघते, एक दिवस त्याच्या भेटीसाठी देणे, त्या दिवशी आतुरतेने मी त्याची वाट पाहते. पण वाट पाहता पाहताच दिवस निघून जातो. मनामधील जीव घेणे वादळ संपते, तेव्हापासून आजपर्यंत ती पुन्हा उलटसुलट प्रेमाचे गणित मांडते, पण उत्तर सापडत नाही. तिच्या पदरी अखेर निराशाच येते.

साफल्याविना उत्कट प्रेम:

'ललाटरेषा' या कवितेतून साफल्याविणा वाट पाहणारे उत्कट प्रेम भेटते, लोकनाट्यात नृत्य सादर करून लोकांचे मनोरंजन करणारी नर्तिका नायकाला सोडून जाते तो परत येईल असे त्याला वाटते, पण ती येणार नाही. या नायकाला आपली वीणा घेऊन पुन्हा प्रवास करावा लागणार आहे. ही त्याची ललाटरेषा आहे. नियती आहे. आपण सारी जण नियतीच्या हातातील बाहुली आहोत अशा आशयाचे वचन प्रसिध्द इंग्रजी कादंबरीकार थॉमस हार्डी यांचे आहे. त्याचाच येथे प्रत्यय येतो. असे असले तरी माणसाने दुःख पचवत पुढेच जायचे असते.

प्रतीक्षा करणारी प्रीती:

प्रियकराची उत्कटतेने वाट पाहणारी नायिका" भरली ओंजळ जड होते" या कवितेत आहे. ती म्हणते की मनातील काहूर आवरून मी मन स्थिर ठेवण्याचा प्रयत्न करते. अखेर मीलनाचा क्षण येतो व तो तसाच जातो. व सर्व काही जळून जाते. पुन्हा प्राणपणाने ओंजळ भरते. पुन्हा त्याच वेदना नशिबी येतात. जशी भरल्या स्तनाला कळ लागते तशी ओंजळ भरलो ओटे दुखातात. व पुन्हा निराशा पदरी येते पुन्हा भावभरल्या जड ओंजळीने आपल्या

प्रियकराची ती वाट पाहते. प्रीतीच्या साफल्याची वाट न पुळता ती पाहते; पण प्रेम सफल होत नाही.

तृप्त प्रेमभाव

आज चंद्र झाले मन, या कवितेत तृप्त प्रेमभाव व्यक्त झाला आहे. प्रेमानुभावाने तृप्त झालेल्या नायिकेचे मन शीतल प्रकाश देणा-या चंद्राप्रमाणे झाले आहे. ते मन चंद्रवेडा/वेडी म्हणजे आपल्या प्रियकराला शोधते आहे. त्याच्या शिवाय चांदणी कापूर बनून पेटले.चंद्रसी, मनाला सांगराचा लळा कधी लागला ते समजलेच नाही. मूकपणाने ते कलेकलेने झुरत कळा सोशीत आहे. भरतीची प्रत्येक लाट त्याला बेभान करते.ती चौदा पाकळ्यांनी म्हणजे चौदा दिवसांनी संपूर्ण जगास विसरून हसते, मनाची अवस्था अशी होते

"चंद्र चंद्र होते मन,
कसे झाकावे कळेना,
असे झुरे, असे फुले,
शोश नभीचा पुरेना । (पृ.७)

~~समाधानानी~~ आहे. नायिकेचा प्रेमानुभाव तृप्त आहे.समाधानानी आहे. त्याचबरोबर प्रेमचिंतनही या कवितेत आहे.

श्रेष्ठ प्रेमाचे दर्शन:

"श्रद्धा" या कावतेत कवयित्रीने श्रेष्ठ प्रेमाचे वर्णन केले आहे. राधा-कृष्णाची पूर्ण प्रीती ही आदर्शप्रीती समजली जाते. आपला संसार म्हणजे कोणकणी रुजलेले गोकुळ आहे व ते कुणाही पाहणाऱ्याच्या नजरेने वठणार नाही. संकटांना सामोरे जाऊन अडचणींवर मात करीत आपण जीवन कंठीत आहोत. कर्तव्यासाठी जरी आपला जोडीदार कठोर झाला तरी कधीही कुठेही

विषारी भाव नोंदले नाहीत.राधापण हे जन्मोजन्मीच्या तपाने लाभते ते सोपे नाही. त्यासाठी जीव ओतून द्यावा लागतो व खूप काही सोसावे लागते.तेव्हा सर्व काही वाईटही चांगले होते व स्त्री पुरुष हा भेदभाव रहातच नाही,रहते ते फक्त निर्व्याज प्रेम.

आतुर प्रीती:

"वैशाखमासी" या कवितेची नायिका आपल्या नायकाची आतुरतेने वाट पहात आहे. वैशाख महिन्यातील नवपर्णराशी जशा आकाशाकडे पावसाची वाट बघत असतात. त्याच आतुरतेने तिचे भोळे मन त्याची वाट पाहते.वैशाखमासात ज्याप्रमाणे धरती तृप्त होते.मेघ भरून येतात व पावसाची चाहूल लागते तशीच त्याच्या येण्याची तिला चाहूल लागते व मनाची तगमग होते. वैशाखातील घन पाऊस न पाडता जातात,त्याप्रमाणे चाहूल लागूनही तो न आल्याने ती खिन्न होते. त्याची ही उपेक्षा तिच्या मनाला व्याकूळ करते

सुरातून प्रीतीचा आविष्कार:

सुरातून प्रीतीचा आविष्कार "वलय" सारख्या कवितेतून पहावयास मिळतो. सतारीचा टवटव हा स्वर लय विलय हा भाव व्यक्त करतो. सतारीच्या स्वरांची वलेये निर्माण होतात. त्याचीच लय पकडून नायक नायिकेच्या भावविश्वात प्रवेश करतो. तिचे भावविश्व सुगंधित होते,पण त्याच्या प्रेमामुळे तिच्या मनातल्या पवित्र भावना मुखर होतात. नवा हर्ष,नवी व्यथा आकार होते. जे जपलेले आहे, मनात ठेवलेले आहे, ते हा नायक उघड्यावर टाकतो आहे, पण नायिका प्रेमाच्या अधिक उच्च पातळीवर गेलेली आहे. त्या दोघांच्या मनाचे मीलन झालेले आहे.ते दोघे एकमेकात जणू एकरूप झाले आहेत.

एकटेपणा नाहीसे करणारे प्रेम:

"मनाच्या मनात" या कवितेत कवयित्रीने पोरकेपणा, एकटेपणा नाहीसे करणारे प्रेम वर्णन केले आहे. मनातल्या मनात झालेला आनंद हा स्वच्छंदपणे

मनात घोळत राहायचा, खूप खूप आनंद झाला हे सांगावे म्हटले तरी सांगावयास कोणी नव्हते, त्याचप्रमाणे मनातील व्यथा वेदना याही अनाथच होत्या. त्यांचा आर्तस्वर कोणी ऐकायलाही तयार नव्हते. आनंद व दुःख यांना कोणीही वाटेकरी नव्हता. तेव्हा मनाला प्रियतमाची आर्द्र हाक ऐकू आली त्याचबरोबर सुख व दुःख धावले. आता मात्र सुखदुःखाच्या गोष्टी ऐकणारे कोणीतरी होते. एकटेपणा संपलेला होता.

प्रेमातील अमरत्व:

"भेट" या कवितेत कवयित्रीने प्रेमातील चैतन्याचे दर्शन घडविले आहे. कवितेची नायिका म्हणते की आपली प्रत्येक भेट जणू पहिलीच असते. प्रत्येक वेळी संकोचाची थोडी दरी असते. पण नजरभेटेतच जन्मोजन्मीची ओळख पटते. पुन्हा सगळी संकोचाची दरी नाहीशी होते. चार वाक्यातच एक अनाम नाते जुळते. मनामधील सुप्त भावना पल्लवीत होतात-उसाशातून मनोव्यथा व्यक्त होते. सगळ्या वेली व वृक्ष फुलांनी भरल्यासारखे वाटतात. मध्ये जणू काही काळ लोटलाच नाही. नेहमीच आपली भेट ही पहिली असते. चैतन्यमयी असते या कवितेत कवयित्रीने प्रेमातील अलौकिकता व्यक्त केली आहे.

स्वप्नमय प्रेम:

"आठवंत फक्त" या कवितेची नायिका ही प्रेमस्वप्नांच्या दुनियेत वावरत आहे. तू माझ्या केसावर ओठ टेकलेस का, आठवत नाही. पण नेत्रासमी झगमगणारे चंद्र सूर्य आठवतात व कपाळावर भांगापाशी झिळमिळणारे जडावाचे फुल आठवते. तू माझ्या डोळ्यांत प्रेमभरल्या नजरेने पाहिले होते का नाही, ते आठवत नाही, पण नेत्रासमी अथांग समुद्रामध्ये हसणारी कमळं आठवतात, ती मला आपल्या पाकळ्यांत झोलून घेत होती. तू मला हाक मारली होती का ते आठवत नाही, पण

"आठवतं फक्त पाहटेचं धुक आणि आणि त्यात मिसळू पाहणारा अंधुक अंधुक शुक्रतारा "(पृ. ४५)

अशा प्रकारे धुक्या सारख्या तरल प्रेमभावनेत ती रमते.

"तेव्हाही" पण ही कविता अक्षय प्रेमाचे दर्शन घडविणारी कविता आहे. केव्हातरी या स्वप्नांतून मी बाहेर पडेन का, व एकदा अखेरच्या माहेरी म्हणजे स्वर्गलोकी जाईन तेव्हा माझ्या गळ्यात प्रीतीचे सूत्र असेल व भाळावर कुंकू असेल. हिंदू धर्म संस्कृतीप्रमाणे स्त्रीला अहेवपणी मरण आल्यास ते भाग्याचे समजले जाते. कवितेची नायिका ही सुध्दा अशा मरणाची अपेक्षा व्यक्त करीत आहे.

सांकेतिक प्रेम:

"स्वप्नमहाल" मध्ये सांकेतिक प्रेमाचे, बाळबोधपणे वर्णन येते. स्वप्न महालाचे वर्णन करताना सात दारे, सात रंग, सात पाकळ्या व सात मनोरे असल्याचे सांगितले आहे. पहिल्यातून आत गेल्यावर प्रीतीची सुरुवात होते. दुस-यामध्ये प्रीतीचे इंद्रधनुष्य दिसते. तर तिस-यात अमृताचे पेले दिसतात. चवथ्यामध्ये फुलांचे झोले, पाचव्यामध्ये रत्नहार व सहाव्यामध्ये वेगळे ऐश्वर्य दिसते. सातव्यामध्ये मात्र या सर्वांची परीसीमा ओलांडली जाते व ओठांनी डोळे झाकले जातात. असा हा स्वप्नमहाल आहे.

दुःखमय प्रेम:

"सारे शरीरच जेथे "व" जपायचा एकटेपणा" या कवितांमध्ये दुःखमय प्रेम आढळते. सारे शरीरच जेथे आसवे गाळते, तेथे ओठ आवळून दुःख कसे झाकावे. आजवर हृदयातील दुःखाची धार बंद करून त्यावर हास्याची मोहर ठोकली होती. मन दुःखाच्या आगीत कढले. दुःखाच्या रसायनाने हास्याच्या मोहर करून आकाशाला भिडली एवढे प्रचंड दुःख मनात साठले होते. ही

दुःखाधार पाहयला कुणाला डोळे नसावेत, दुःखाचा आक्रोश व ऐकण्यासाठी कुणाला कान नसावेत. आपले दुःख कुणास समजू नये असे वाटते; पण कुणीतरी हे सहानुभूतीने ऐकणारे असावे असे मन म्हणते.

"जपायचा एकटेपणा" ही सुध्दा कविता एकाकीपणा व मनातील दुःख यांचा संदर्भ असलेली कविता आहे. कवितेची नायिका अनवधानाने काहीतरी बोलून जाते व त्याच्या डोळ्यांत पाणी साचते. शब्द जिव्हारी लागतात. पुन्हा ती त्यास मनमोकळेपणे सांगते की तसे बोलावयाचे नव्हते. तुझ्यासारखाच मी सुध्दा एकाकीपणा जपण्याचा प्रयत्न करेन. एकाकीपणा जपताना दुःख होईल, पण ते न दाखविताना मी एकाकीपणा जपेन. आपापला एकाकीपणा जपणे एवढेच आता हाती उरले आहे. त्यामुळे तू माझ्या शब्दांनी दुखावणार नाहीस. अशा प्रकारे दुःख जपणारी हळवी नायिका आहे.

पत्रातून व्यक्त होणारे प्रेम:

"पत्र" या कवितेत प्रियकराचे व्यक्तीत्व प्राप्त झालेले पत्र दिले आहे. पत्र हे पत्रासारखेच असते. पण त्यात काना मात्रा-वेलांटी यांची विशिष्ट रचना गुंतागुंत वाढविणारी असते. काही अक्षरे आश्वासन देणारी असतात. सुट्या सुट्या अक्षरांमधून ज्याला पत्र लिहायचे त्याबद्दलचा अनादर आढळून येतो. तरीसुध्दा प्रथम सप्रेम नमस्कार लिहिलेला असतो. तो केवळ उपचार म्हणून. विराम-चिन्हे बरेच काही झाकतात. काही गर्भित सांगतात. पत्राच्या शेवटी लोभ असावा ऐवजी असावाच असा आर्जव आणि आग्रह असतो. हे सर्व जाणल्यासच समजते. पत्र हे पत्रासारखेच असते, पण त्यातही काही अव्यक्त असते. ते जाणून घ्यावयाचे असते.

'सप्रेम प्रणाम' या कवितेतही पत्र व त्यानिमित्ताने व्यक्त होणाऱ्या भावना यांचे दर्शन घडते. पत्राचा मायना लिहिताना विनंती विशेष असे.

SHIVAJI UNIVERSITY LIBRARY KOLHAPUR

म्हटले जाते. परंतु कवितेची नायिका पत्र कोरेच ठेवते.त्या को-या भागात अव्यक्त सगळे व्यक्त होते.हे वाचणा-याने जाणावे असी तिची इच्छा आहे. लोभ असावा व शेवटी सहीसाठी हात थांबावे. वाचणारा आपल्या मनातील भाव जाणेल का असा तिला प्रश्न पडतो. या सर्व व्यथेत ती सही करते.

प्रीतीचा स्मरणोत्सव

प्रीतीच्या स्मरणोत्सवाने आलेली प्रसन्नता" रात्र अशी भिजलेली" कवितेत पहावयास मिळते.रात्र भिजलेली आहे. ती दु:खी आहे. त्यामुळे झाडेही स्तब्ध आहेत. सजल मेघातून आकाशात जणू व्याकुळता मूर्त झालेली आहे. जाई जुईची तोंडेदेखील सुकलेली आहेत. त्यांचे नि:श्वास दु:खपूर्ण आहेत. त्यावेळी या प्रेयसीच्या मनात एक कळ उमटते. आणि अंत:करणात एक स्मृती प्रवेश करते. ती नायिकेच्या अंत:करणातील आणि वर वर्णन केलेली आसमंतातील व्याकुळता दूर करते. मन नाचू लागते. मनात व सर्वदूर,प्रसन्नता जाणवू लागते. जाईजुईंना बहर येतो. झाडांची स्तब्ध राहण्याची शपथ सुटते.ती डोलू लागतात.ही सगळी स्मृती म्हणजे नायकाच्या सहवासात घालविलेली न्हालेली पहाट हीच आहे. त्या पहाटेच्या आठवणीच्या प्रसन्नतेने ही रात्रदेखील प्रसन्न रूप धारण करते. व्याकुळतेचे प्रसन्नतेत रूपांतर करण्याची जादू ब प्रीतीत आहे. हेच खरे.

ओढाळ प्रेम:-

"ओढाळ प्रेम" या कवितेत ओढाळ प्रेमाची अपेक्षा करणारे शरीर व शेवटी मनाचा त्यास नकार व्यक्त होतो. निव्वळ शारीरिक प्रेमापेक्षा भावनिक ओलाव्याचे श्रेष्ठ प्रेम नायिकेस हवे आहे. हे कवयित्रीने अवघ्या सहा ओळींत सांगितले आहे.

भित्रे पण धीट होऊ पाहणारे प्रेम:

"तुझ्या संगती यावया" या कवितेमध्ये धीट होऊ पाहणारे प्रेम वर्णिले आहे. कवितेची नायिका म्हणते, तुझ्या संगती यावयास उर धापापतो. लाज व

भय वाटते.तुझ्या संगती यावयाला किती प्रयत्न करावेत, स्वत:ची भीती व लोकांची भीती मोडावी लागते. धीर होत नाही. शेवटी मनोव्यथा अंती तुझ्यासंगे यावयास सांगते. लाज व भय लपविण्यासाठी तुझ्या मनाचा मी आसरा घेते व निर्भय बनते. आता मात्र तिचे प्रेम धीट बनते व ती त्याच्याबरोबर निरंतर यावयास तयार होते.

प्रेमामध्ये केव्हा -केव्हा असुरक्षिततेची भावना आकार घेते " आज मात्र" या कवितेतील नायिका असुरक्षितेच्या भावनेने भेदरून गेलेली आहे. तिच्या व प्रियकराच्या वाटचालीमध्ये तिला कधीच अंतर भासले नाही. या वाटचालीत वळणे होती, पण एकमेकांविषयीच्या विश्वासाच्या विसाव्याच्या जागा होत्या. नकळत एकमेकांची मने एकमेकांत गुंफलेली होती. वाट मुक्त होती. हसत होती. चकव्याचा खेळ चालू होता. पण त्या चकव्यातदेखील माया होती. एकमेकांना दु:ख दिले, तरी ते दु:ख हवेहवेसे होते. पण आज हे चित्रच पालटलेले आहे. फक्त गारठा बोचतो आहे. शब्द आणि शस्त्र यांचा अभाव असला तरी सगळ्या वाटा रोखलेल्या आहेत असे वाटते. थोडक्यात असुरक्षिततेची भावना सातत्याने जाणवते आहे.

प्रेमातील कृतज्ञता:

प्रेमाविषयीची कृतज्ञता कधी वेगळ्या प्रकारे स्पष्ट होते "ऋण"[पृ.५८] या कवितेत न फेडावे वाटणारे ऋण आहे. जीवनात अनेकांची देणी द्यावयाची असतात. जरी देणी सव्याज फेडली तरी डोक्यावर देण्याचे ओझे राहिलेलेच आहे असे वाटते. पण प्रियकराचे ऋण मोजता येण्यासारखे नाही. ते फेडावेसेही वाटत नाही. ते ऋण डोक्यावरची शोभा म्हणून मिरवावे असे प्रेयसीला वाटते. हे ऋण फेडावयाचे म्हटले तर ते धनाने अथवा हाताने फेडता येणार नाही. त्याचे मापच धन आणि हात यांच्या साहयाने भरता येणार नाही. जरी ते अमाप असले तरी त्याचे शिरावर ओझे वाटत नाही. हे ऋण वागवण्यात, या ऋणात

कर्जबाजारी म्हणून राहण्यात या प्रेयसीला आनंद वाटतो आहे.

संकेतावीण भेटणारे प्रेम:

"त्या रस्त्यावर" या कवितेत कवितेच्या नायिकेची व तिच्या प्रियकराची भेट संकेतावीण होते. अनेक रस्ते असतात. काही बरे काही वाईट पण सर्वापलीकडे ह्या-याचा एक रस्ता आहे. तो कधी सुखाचा तर कधी दु:खाचा असतो. या रस्त्यातच दोघांची भेट संकेतावीण होते. दु:खाच्या मार्गाने दोघेहीजण सहजपणे व निर्भयपणे मार्गक्रमण करतात व याच भेटीतील दूरत्वाच्या हाणाहाणांतून जवळपण मिळते, त्या जवळपणाच्या तेजावर दोघेही मार्गक्रमण करतात. दोघांचेही मार्ग वेगवेगळे आहेत, पण याच मार्गावर दोघांची संकेतावीणा "भेट होते.

कौटुंबिकता हे आशयसूत्र असणा-या कविता पुढीलप्रमाणे आहेत.
"ती" (पृ.२१) "झुणा" (पृ.३३) "चंद्रकोर" (पृ.३५) पौर्णिमेतली रात्र (पृ.३६).

हे आशयसूत्र आदर्श गृहिणी, गृहिणीचे प्रेम, सुनेचे स्वागत व स्त्री जीवनातील दु:ख या अंगाने स्पष्ट झाले आहे.

आदर्श गृहिणी :

"ती" या कवितेत सोज्ज्वळ व जबाबदार गृहिणीचे चित्र रेखाटले आहे. ही गृहिणी म्हणजे चालते बोलते चित्रच आहे. की दैवी अशी कोण व्यक्ती आहे. असे वाटते पहाटे... धुक्याने घडवावी अशी ही नाजूक गृहिणी आहे. ती आपल्या लोन डोळ्यांतून सा-या घरावर मायेची पाखर घालीत असते. कोणतेही वस्त्र तिच्या अंगी उठून दिसते. चांदीच्या कंकणातून रत्नाचे तेज झरत असल्याचे दिसते. ती मितभाषिणी आहे. तिचे शब्द हळू

व अजू असतात. तिच्या भूपाळीने घरी झुंजू-मुंजू होते. तिच्यामुळेच घराला देवघराचे स्वरूप येते. तिने केलेली पूजा तिचे चंदनाप्रमाणे झिजणे, सारे काही घराचा कोपरान् कोपरा व्यापून टाकते. तिच्याशिवाय घरातील पानही हालत नाही. परंतु तिच्या अस्तित्वाची जाणीव मात्र कुणाला होत नाही. घरातील सगळे दु:ख, अपमान, अशांतता हे सर्व ती एकांतात सहन करीत असते. दु:ख अपमान ती गिळत असते.

गृहिणीचे प्रेम:-

"घुणा" या कवितेतील गृहिणी प्रेम लपविण्याचा प्रयत्न करते. परंतु ते व्यक्त होते. हे कवयित्रीने सूचकतेने मांडले आहे. किती अलगद पाऊल टाकित आले म्हणजेच कितीही प्रेम लपविण्याचा प्रयत्न केला, तरीही घुणा उमटल्याच. प्रेमाच्या घुणा पुसण्याचा प्रयत्न केला. परंतु त्या आणखी ठळक व बोलक्या झाल्या.

प्रेम ही लपली जाणारी गोष्ट नाही. याचा प्रत्यय आपणास या कवितेत येतो. या कवितेतील गृहिणीचे प्रेम असेच न लपता व्यक्त होते.

सुनेचे स्वागत:-

सुनेच्या स्वागतासाठी उत्सुक असलेली सासू आपणास "चंद्रकोर" या कवितेत आढळते. सुनेचे असणारे कौतुक व प्रेम येथे व्यक्त होते. मेंदी लावलेली पाऊले उगाच डोळ्यापुढे येतात. कानामध्ये हिरवे चुडे किणकीण करू लागतात. डोळ्यांसमोर सोनसळीची किनार झगमगते, तर जोडव्याच्या तालावर लगबग चालू असल्याचा भास होतो. तिच्या आगमनासाठी सासू उत्सुक आहे, परंतु ती कोठे आहे ते अजून कळाले नाही. मात्र तिच्या आगमनाचे क्षण क्षण मोजले जात आहेत. कवयित्रीने सुनेला चंद्रकोर म्हटले आहे. तू नाही तर उजळून टाकायला

ये.माहेरच्या ममतेने स्वागत करण्यासाठी सासर तयार आहे.

स्त्री जीवनातील दु:ख

"पौर्णिमेच्या रात्री" या कवितेत कवयित्रीने स्त्रीजीवनातील सुख: दु:खे मांडली आहेत. पौर्णिमेच्या रात्री तळमळत गालांवर, आसवांवर दु:खाची चिन्हे घेऊन विस्कटलेले केस निळ्या फिक्या रेशमी उशीवर सोडून पुन्हा उकललेल्या जखमा सोसत दुःखाची सोबत रात्र करीत आहे. ग्रीष्मामधील तीव्र वादळासारखी दु:खे आयुष्यात आली; पण या वादळी दु:खांनी नाशातून माणिकमोती पेरले. नंदनवनामध्ये अमृत ओतणारा बहर आयुष्यात आला; पण आता पानगळ अटळ आहे. हेच जीवन आहे का ? हेच हे तर कठपुतळीच्या नाचाप्रमाणे झाले. सर्व काही संपले तरी उर फुटेपर्यंत नाचायचे.अगतिकपणे जगायचे.दु:ख्यामध्ये लपलेली" क्रूर वादळे सहन करीत एकाकीपणे जगत रहावयाचे.

वात्सल्यपरता हे आशयसूत्र असणाऱ्या कविता पुढीलप्रमाणे आहेत. "आईपणाची भीति"(पृ. १५) "मागणे," (पृ. ५१) "काळ रांगतो" (पृ. ६९)

हे आशयसूत्र प्रेरणादायी संस्कार, कृतज्ञता व वात्सल्यात रममाण होण्याची वृत्ती या घटकाने स्पष्ट झाले आहे.

प्रेरणादायी संस्कार:

"आईपणाची भीति" या कवितेत विज्ञानयुगातील आईच्या व्यथा व्यक्त झाल्या आहेत. दुसऱ्या महायुद्धातील अणुबॉम्बमुळे माणसाच्या मनामध्ये असुरक्षिततेची, अगतिकतेची भावना निर्माण झाली. त्याचेच वर्णन या कवितेत आहे.

कवयित्री म्हणते,आजच्या इतकी आईपणाची भीती कधीच वाटली नव्हती. आज मुलगा विचारतो आहे की,कोणती वाट धरू ? तेव्हा माझ्या डोळ्यांत अश्रू उभे आहेत. प्राण कंठाशी आले आहेत. मनामध्ये प्रश्न आहे की, कोणती दिशा तुला दाखवावी.यश, ज्ञान सुख यांच्या खाणाखुणा कोणत्या.सगळीकडे सैतान वावरताना दिसतो आहे. माणुसकी कमी दिसते.

जळी, स्थळी व आकाशातही अणुबॉम्बने वर्चस्व स्थापित केले आहे. आज आईच्या कुशीतसुध्दा निवारा उरला नाही. कोणतेही स्थळ हिरोशिमा होण्याची भीती आहे. तरीही गतिमान युगात गतिमान राहिलेच पाहिजे. अनर्थ कसे टाळावेत ही युक्ती मात्र कुणी सांगत नाही. तरीही आई आपल्या मुलाला सांगते, की तू भावू नकोस. तुझा तूच ज्ञानमार्ग शोध, कोणतीही दिशा धर. पण माणुसकी विसरु नकोस. असा सल्ला ती आपल्या मुलास देते. धीराने वाग. एक लक्षात ठेव प्रत्येकाला आई असते हे विसरु नकोस.

या कवितेतील आई ही सर्व आईंची प्रातिनिधिक आई आहे. मानवतेबद्दल असणारी कणव आणि मुलाबद्दलचे वात्सल्य तिच्यात आपणास दिसते.

कृतज्ञता:

"मागणे" या कवितेत कवयित्रीने आईबद्दलची कृतज्ञता व्यक्त केली आहे. त्याचबरोबर आईबद्दलचे प्रेमही व्यक्त झाले आहे. कवयित्री म्हणते, आई मला जन्म देताना तुला ज्या प्रसववेदना झाल्या त्या आज माझ्या माझ्या आहेत. तुझ्या मरणाचे दुःख मांडीवर घेऊन त्याला उरी कवटाळून आसवांच्या सरी पाजते आहे. रात्रंदिवस मी तुला हाका मारते. तुझ्या आठवणीने रात्र रात्र जागते. तू अक्षरात आकारुन ये. तुझ्या मरणाचा घाव हा अमृताचा बनून तुझ्या स्मृतीस्तव माझी वाचा पल्लवू दे. अशी सेवा माझी आई तू घे, हेच माझे मागणे आहे.

वात्सल्यात रममाण होण्याची वृत्ती:

"काळ सांगतो" या कवितेत काळाला विसरुन वात्सल्याचा आनंद लुटणारी आजी आपणास दिसते. लहान मुलांचे दुष्ट, छुपटी, तिटी व काजळ या गोष्टी कवयित्रीला आठवतात. पुढे बाळ बोबडे बोल बोलतो. चंद्राबद्दल कुतूहल मनामध्ये

जागे होते. त्याचबरोबर काळही हळू हळू पुढे सरकातो. काजळभरल्या, दूध माखाल्या गालावर ओठ टेकवत असताना जावळातून बोटे फिरवत असताना काळ हळू हळू बळ शोषून घेत असतो. पुन्हा मरगळ झटकून जगाकडे पाहिले जाते. माथ्यावरचा कापूस विसरून म्हणजेच वृध्दत्व विसरून पुन्हा आणखी एखादया नव्या नातवंडाची मन मागणी करते. काळ पुढे धावत असतो. काळाबरोबर कवयित्रीही पुढे मार्गक्रमण करते. गोड गोष्टींची आठवण काढीत काळाला विसरून वात्सल्याचा आनंद अनुभवते.

निसर्गाची ओढ हे आशयसूत्र" असणाऱ्या कविता पुढीलप्रमाणे आहेत. "नवलाईचं फुल" [पृ. ९], मध्येच आळे [पृ. २६] "या सा-यांहून बेभान[पृ. ४३] चाफ्याचा झाडा" [पृ. ७२] अजिंठा [पृ. ८१]

हे आशयसूत्र निसर्ग" कौटुंबिक जीवनाचेच रूप, निसर्गाशी एकरूपता, तरलस्वाची ओढ, बालपणीची स्वप्नमयता निसर्ग कलाकृती एकरूपता या अंगाने स्पष्ट झाले आहे.

निसर्ग कौटुंबिक जीवनाचेच रूप:-

"नवलाईचं फुल" या कवितेत कवयित्रीने फुलांवर मानवी भावनांचा आरोप केला आहे. बागेमध्ये कधी-कधी फूल येते पण ते नवलाईचे असते. हव्या त्याच गोष्टीं-शिवाय ते फुलणार नसते. ते फुल प्रेम जाणते. आभाळमाया जाणते. हा-या डोळ्यांनी आभाळ बघताना मनामध्ये आनंद मावत नाही. सूर्य होऊन आभाळ खाली येते. व त्याला हृदयाशी धरते. म्हणजेच सूर्य किरणे फुलावर पडतात. तेव्हा त्याला प्रसन्न वाटते. आभाळ [ईश्वर] फुलासाठी सूर्य होऊन वाटा होऊन खाली येते. ते फुलाला कुरवाळते. पण केव्हा तरी पाखरू बनून, गंभीर मौन सोडून त्याच्याशी वेल्हाळपणे गप्पा का मारीत नाही.

या कवितेत कवयित्रीने अचेतनावर सचेतनाचा आरोप केला आहे.

SHIVAJI UNIVERSITY LIBRARY KOLHAPUR

निसर्गाशी एकरूपता:-

"मध्येच आठवे" या कवितेत कवयित्रीने नदी परिसराचे वर्णन केले आहे. तासगावजवळील कृष्णा नदीच्या पात्राकडे पाहताना कवयित्रीचे देहभान हरपून जात असे, त्याचीच आठवण कवयित्रीस मध्येच होते. नदीच्या अपूर्व तीराचे चित्र आठवते. असे वाटते की, सूर्याने सहेतुकपणे पाण्यात रेशमी वस्त्र टाकले आहे. नाजूक नाजूक लहरींवर शेला झुलत आहे. सभोवताली जांभळे गूढ काहूर दाखून रात्र जणू मूकपणे उभी आहे.

तरलत्वाची ओढ:-

"या सा-यांहून बेभान" या कवितेत कवयित्री निसर्गातून परमेश्वराकडे पाहते. अक्षरांचा ढोबळपणा ज्यास सोसणार नाही असे काही कवयित्रीस हवे आहे. स्वरांचे घुंगरूही त्यास मानवणार नाहीत. पारिजातसुद्धा बोजड वाटेल असे काही हवे आहे. ते गंधापेक्षा तरल असे असावे. वनराईने जणू त्याला हिरवी गर्द मदिरा पाजली आहे व चांदण्याच्या तेजाचा अर्धा पेला झोकला आहे. वा-याच्या गतीतील थोडी अधीरता पहाटेचा निसूता स्पर्श या सर्वांतून उफाळून आलेले, या सा-यांहून बेभान असे काहीतरी कवयित्रीस हवे आहे. म्हणजेच परमेश्वर प्राप्तीची इच्छा आहे.

बालपणीची स्वप्नमयता:-

" चाफ्याच्या झाडा" ही कविता लिहिताना कवयित्रीच्या नजरेसमोर होते ते तासगावच्या वाड्यातील चाफ्याचे झाड. हे चाफ्याचे झाड कवयित्रीच्या स्वप्नात एके दिवशी येते. कवयित्री त्याला सांगते की, तेव्हाच आपले ठरले होते की,

की आता दु:ख करावयाचे नाही. तुझी हिरवी पाने पांढरी फुले माझ्या मनात अजून आहेत मीही तुझ्या मनात अजून आहे का ? माझ्या आठवणीने तू डोळ्यात पाणी आणू नकोस. ओळखीच्या तालासुरात हादग्याची गाणी म्हणू नकोस. तुझ्या आळ्यातच मी तळ्यात मळ्यात खेळ खेळतेय. घोड्यावर असल्याप्रमाणे तुझ्या फांदीवर बसून स्वप्नात वावरलेय. काहीतरी चुकतय. त्यामुळे तुलाही वेदना होतात हे तुलाही कळतय पण हसून समजावायचं हे ठरलेलं आहे. कुणीही बोलायचं नाही. मनात ठेवायचं. तुझ्या आठवणींच्या फुलांची ओंजळ भरली आहे.

या कवितेत कवयित्रीला चाफ्याच्या झाडाबरोबर बालपणीचे दिवस आठवतात. त्या आठवणीमध्ये मन रंगून जाते.

निसर्ग-कलाकृती एकरूपता:

निसर्गाच्या कुशीत मानवी कलाकृती एकरूप होते. चैतन्यमय होते. याचा अनुभव "अजिंठा" या कवितेत येतो. अजिंठ्याच्या सभोवतालचे डोंगर, तेथील वृक्ष यांचे बहारदार वर्णन येथे येते त्या परिसरात एक चौकटीशिवा-च्या उभट गोल आरसा आहे आणि एखाद्या शोभादर्शकाप्रमाणे लाल, हिरवा, पिवळा, निळा असा रंगांचा उत्सव तेथे चालू असतो.

निसर्गाची ही किमया जशी लेण्याच्या बाहेर असते तशी लेण्यातही एक आगळी किमया पाहायला मिळते. बुद्धमूर्तीच्या चेह-यावरील शांती, त्या मूर्तीच्या चेह-यावरील सुखदु:खाच्या पलीकडे जाणारे स्थितप्रज्ञ हास्य, नर्तकीच्या अंगोपांगातून व्यक्त होणारे सौंदर्य कोणालाही मोहवून टाकते. संन्यास, विलास, दु:ख, शांती यांचे विचित्र एकरूपत्व येथे पाहावयास मिळते. या सौंदर्याचा अर्थ सांगणारा व ऐकणारा दोघेही भाबडे असतात. त्यांचा आनंद त्यांचे चिंतन भाबडे असते, म्हणजे त्याला मर्यादा असतात, पण येथील

खिन्नीज मुक्त आहे व दगड समजूतदार आहे. धाडक्यात निसर्ग आणि कला मानवी अंत:करणाला सतत आवाहन करीत असतात. प्रेरणा देत असतात.

प्रा. अनुराधा पोतदार यांनी या कवितेचे मर्म समर्पकपणे मांडले आहे. त्या म्हणतात;

"चाफ्याच्या झाडा, चाफ्याच्या झाडा, काहितरी चुकतंय कुठतरी दुखतंय तुलाही कळतंय, कळतंयना."

या उद्गारातील आर्तता व सूचकता किती हृदयस्पर्शी आहे. "तुलाही कळतंय ना" या कातर प्रश्नाने भावच्छटा कशी गडद झाली आहे. अवघ्या आयुष्याला व्यापून उरणारी ही मुकी व्यथा जीवन संगीताचे सूर मनाजोगते न जुळल्याचे ही व्यथा पायात काटा मोडला असतानाही चालत राहवं तशी ही व्यथा चाफ्यालाच ती कळते आहे. पण ती वेदनाही नेहमीच ओठ मिटून राहणार आहे. "हसून साजरं" करण्याच हे व्रत पाळताना या वृत्तीत आणि कवितेतही कटुता व विखार मात्र आला नाही हेच तिचं सौभाग्य आहे. तळाशी गाळ असावा आणि वर निर्मळ पाणी उरावं तशी व्यथाही इथं अंतरीच्या सुगंधात परिमळली आहे. गाढ समजुतीतून, संयमातून आलेल्या सोशिकतेची, स्वीकारशीलतेची संगत तिला कशी लाभली आहे हे या कवितेतून पहावे, म्हणूनच ह्या-पाखु-या अर्थाने ती स्वगीत्वाची कविता आहे. कुठं बोलायचं नाही. मनात ठेवायचं. हसून सजवायचं ठरलं. असलं, तरी अंत:कर/णातल्या /ण्या स्वप्नफुलांनी तिची ओंजळ भरलेलीच आहे. भरलेलीच राहणार आहे.

चिंतनपरता हे आशयसूत्र असणा-या कविता पुढीलप्रमाणे आहेत. "सायुज्य" (पृ. ३०) "अताशी मी, नसतेच इथे" (पृ. ६७) "जेव्हा आठवतात."

(पृ. ६० ) "माझ्यासाठी" (पृ. ७९ ) "थोडी उरली आहे" "वाट" (पृ. ८२ )

हे आशयसूत्र परमेश्वराशी एकरूप होण्याची वृत्ती, घरातील माणसांचे वेगळे वर्तन, निळ्या रंगाची ओढ, स्वप्नमयता या घटकांनी व्यक्त झाले आहे.

परमेश्वराशी एकरूप होण्याची वृत्ती

"सायुज्य" व "आताशा मी नसतेच इथे" या दोन्ही कवितांमध्ये कवयित्री परमेश्वरचरणी एकरूप होऊ इच्छित असल्याचे दिसते. सायुज्य मध्ये कवयित्री म्हणते

"निराकार आकाशाशी
आता सदाचीच मैत्री
एक जाहले आकाश
जळाचिया गात्री गात्री" (पृ. ३० )

ओढाळ भावनांच्या उधाणाचा व ओहोटीचा खेळ नाहीसा झाला असून आता हृदयात केवळ आकाशाचे प्रतिबिंब दिसते. आयुष्यातील सुखदुःखी आठवत आता ती कुढत बसत नाही. तिला आकाशाचे म्हणजेच परमेश्वराचे वेड लागले आहे.

"आताशा मी नसतेच इथे" या कवितेत कवयित्रीस परमेश्वराचा ध्यास लागल्याचे दिसते. ती म्हणते की, मी आताशा इथे नसते जरी माझी येजा असली तरी म्हणजेच माझे सर्व डोळे आकाशाकडे म्हणजेच परमेश्वराकडे लागले आहेत. मी कुठे असते म्हणून काय विचारता, या गावाच्या वाटेला फारसे कुणी जात नाही. तिथं फार मोठं घर आहे. घराला भिंती

नाहीत. असे नाही. उंबरठा आहे. त्यावरून नदी वाहते. त्यातच मी निर्मळ वाहते, हे सारे वर्णन पारलौकिकाचे आहे. कवयित्री पुढे म्हणते, हळू हळू कापणारे रेशीम तुटतेच म्हणजेच रेशमी भावबंध तुटताहेत. गळा मोकळा होऊन गाणे ओठापर्यंत आले आहे, म्हणजेच पारलौकिकाची भेट होण्याची वेळ जवळ आली आहे. अंतर्पट दूर होईल, म्हणजेच इहलोकातून परलोकात जायला ती सावध झाली आहे.

"मी झालेय निळं गाणं- निळ्या नदीत वाहणारं निर्माल्याबरोबर"

[पृ. ६८] यामधून कवयित्रीची परलोकात जाण्याची तयारी समजते.

घरातील माणसांचे वेगळे वर्तन :

“जेव्हा आठवतात " या कवितेत घरातील लोकांच्या वागण्यामुळे होणाऱ्या दुःखाचे, चिंतनाच्या पातळीवरचे विवेचन या कवितेत आहे. कधी कधी घर हे घर उरत नाही. कारण माणसांचे वागणे विचित्र होते. ते काहीतरी लपवीत असतात व त्याबरोबर त्यांच्या मनातील कावेबाज कोल्हेकुई ऐकू येते, घराचे छत जणू घार बनून मला टिपायला आले आहे. असे वाटते. घर हे घर उरत नाही; ते माणसांचे जंगल बनते, भिंतीवरील घड्याळ अंगावर धावून येते, खिडक्यांचे गज संगिनी रोखतात आणि माजलेल्या निवडुंगासारखी माणसे अक्राळ विक्राळ रूप धारण करतात. अशा या परिस्थितीत केविलवाण्या व प्रेमभुकेल्या डोळ्यांतल्या आशा- आकांक्षा भिजतात व एकाकीपणाचे मरणप्राय दुःख वाटायला येते.

निळ्या रंगाची ओढ:

“माझ्यासाठी" या कवितेत कवयित्रीने आपल्यासाठी काय हवे आहे ते सांगितले आहे. चंद्रसूर्य सर्वांचे सर्वांसाठी आहेत. इंद्रधनुष्य खास कुणासाठी आहे. तसेच पांढरके ढग व अबोली ढग ठेवून असेच कुणासाठीतरी झुळझुळणाऱ्या धार

धार तारका मात्र चुकल्यामुकल्या वाटसरूसाठी असतात मला फक्त निळा रंग आवडतो व त्याचाच मला ध्यास आहे.

स्वप्नमयता:

"थोडी उरली आहे वाट " या कवितेत कवयित्रीच्या स्वप्नाळू वृत्तीचा प्रत्यय येतो थोडी वाट उरली आहे. म्हणजेच थोडेच दिवस जगायचे शिल्लक आहेत, तेव्हा थोडी कळ सोसून आता पर्यंतचे स्वप्नजळ टिकवून धर असे ती मनाला बजावित तुला स्वप्नवेडी म्हणते किंवा खुळ्या स्वप्नात रमणारी म्हणोत ज्याचे त्याला शोभून दिसते स्वप्नातसुध्दा तू देणी नाकारली नाहीस म्हणजे कर्तव्य विसरली नाहीत आपले वैभव उधळले व आकाश स्वीकारायला लावले. हे भाग्य थोडेथोडके नाही. तुझे असणे म्हणजे एक स्वप्नच आहे. नकळत एका स्वप्नातून दुस-या स्वप्नात जायचे आहे. माणसाचे जीवन म्हणजे जणू स्वप्नच असते व पुन्हा दुसरा जन्म म्हणजे दुसरे स्वप्न असते असे कवयित्री म्हणते.

देशभक्तीचे दर्शन हे आशयसूत्र असणा-या कविता पुढीलप्रमाणे आहेत" आम्ही महाराष्ट्र कन्या" (पृ. ११) "निरोप" (पृ. १३)

हे आशयसूत्र मराठी अस्मिता व आईचा उपदेश या घटकांनी स्पष्ट झालेले आहे.

मराठी अस्मिता

"आम्ही महाराष्ट्र कन्या" या कवितेत कवयित्रीने महाराष्ट्र कन्या कशा आहेत ते सांगितलेले आहे.

आम्हा महाराष्ट्र कन्यांना मराठी भाषा व मराठी भूमी स्वर्गाहून प्रिय आहे. महाराष्ट्राचा गौरवशाली सह्याद्री, कळसूबाईचे शिखर व कृष्णा, भीमा, गोदावरी या नदया हे त्याचे वैभव असून संत मुक्ताबाई जनाबाई

यांची भक्ती प्रसिध्द आहे. छत्रपती शिवाजी महाराजांची आई जिजाबाई व राणी लक्ष्मीबाई यांनी स्वातंत्र्याचे महत्त्व उभ्या महाराष्ट्राला शिकविले. आम्हा महाराष्ट्र कन्यांचा कुळधर्म भागवत संप्रदाय असून आम्ही सर्वजण विठोबाची लेकरे आहोत. विठोबा हीच आमची जात आहे. म्हणजेच महाराष्ट्रीय-त्व हीच आमची जात आहे. आम्हा महाराष्ट्र कन्यांच्या वाटे जाऊ नका; कारण,

"हिरव्या काकणात आहे.
गुप्त तलवारीचे ?? पाते" (पृ.११)

अशा करारी व हिम्मतबाज आम्ही आहोत. महाराष्ट्रभूमीच्या रक्षणासाठी आम्ही हाताची ढाल करु. पाठीमागे बाळ बांधून प्राणपणाने लढू. भारताची सेवा करणे हे आमचे कर्तव्य समजतो देशासाठी धर्मासाठी आम्ही आमचा प्राण तळहातावर घेऊन झुंज देऊ.

आईचा उपदेश :

"विशोभा" या कवितेत आपल्या मुलाला स्वातंत्र्यासाठी व देशरक्ष-णासाठी सीमेवर पाठविणारी खंबीर मनाची माता दिसते. कवितेतील मातेचा पुत्र हा रणांगणावर लढण्यासाठी चालला आहे. त्याच्या मातेने मांगल्याचे प्रतीक म्हणून घराला तोरण बांधले आहे व पंचप्राणांच्या ज्योतींनी त्यास ती ओवाळते. ती आपल्या मुलास प्रेरणा देताना म्हणते की, याच विक्रमी बाहूंनी स्वतंत्रता राखावयाची आहे. या खांद्यावर उद्या जगाची शांति नांदेल म्हणून माझ्या डोळ्यांमध्ये एकही दु:खाश्रू नाही. मी वीराचा धर्म जाणते तोंडावाटे एकही हुंदका बाहेर पडू देणार नाही.

कारण,

"मोद त्यागुनि ठेवली.
?? तलवारीला धार" (पृ.२२)

असा व उदात्त मनाची ही माता आहे. ती आपले नाते जिजाबाई व राणी लक्ष्मीबाईशी सांगते. अशुभ काही घडणारच नाही याची तिला खात्री आहे. भवानीमाता तुझ्या शस्त्रांना, अस्त्रांना शक्ती देईल. रणांगणामध्ये शिवरायांचा पराक्रम व डावपेच आठवावेत. माझी कूस तू धन्य करून येशील तेव्हा मी माझ्या हाताने तुला दूधभात भरवीन असे ती आपल्या मुलाला निरोप देताना सांगते.

आत्माविष्कारपरता
-----------------

हे आशयसूत्र असणाऱ्या कविता पुढीलप्रमाणे आहेत. "नजर" (पृ. ७५) "हस्तांदोलन" (पृ. ७७) "लक्ष्मणरेषा" (पृ. ७८) "कसे कळावे" (पृ. ४६)

हे आशयसूत्र वास्तवाचा वेध, लढाऊ वृत्ती, स्त्रीजन्माची दाहक जाणीव, निसर्गसहवासाचा परिणाम या अंगाने स्पष्ट झालेले आहे.

वास्तवाचा वेध:
--------------

-"नजर" या कवितेत कवयित्रीची स्वप्नाळूवृत्ती आढळून येत नाही. विदारक वास्तव या कवितेत व्यक्त होते फक्त तीन ओळींची ही कविता आहे.

"कळसावर नजर ठेवून जगत आले.

नजर राहिली कळसावर,

जिवे पायदळी पडले!" (पृ. ७५)

कधी कधी ध्येय गाठता येत नाही. त्याचीच ही खंत आहे. शिवाय विशिष्ट ध्येय साधण्याच्या प्रयत्नात वास्तव बाजूला राहते.

लढाऊ वृत्ती:

"हस्तांदोलन" या कवितेत कवयित्रीच्या लढाऊ वृत्तीचे दर्शन होते. कवयित्री मृत्यूशी हस्तांदोलन करायला सज्ज झाली आहे. ती सांगते [illegible]

SHIVAJI UNIVERSITY LIBRARY KOLHAPUR

जे करायला लावले ते सर्व मी केले.त्याचबरोबर नियतीने करू नको म्हटले तेसुद्धा मी केले.नियतीच्या डाव्या पायाची ठोकर हातात मी उजव्या पायांनी तिला ठोकरून दिले कधी नियतीच्या पुढे हार मानली, तर कधी नियतीला धुडकावून दिले. आज नाव दोघीही जणी समोरासमोर उभ्या आहेत. ते हस्तांदोलनासाठी कुणाचा हात प्रथम येतो ते अजमावण्यासाठी.

स्त्रीबंधनाची दाहक जाणीव

"लक्ष्मणरेषा" या कवितेत कवयित्रीने स्त्रीच्या व्यथा व्यक्त केल्या आहेत.आजच्या विज्ञानयुगातील स्त्री पुरेशी मुक्त नाही.आजच्या स्त्रीपुढे दाही रेषा लक्ष्मणरेषा बनल्या आहेत. म्हणजेच सर्व बाजूंनी सर्व प्रकारची बंधने आजही आहेत. स्त्रीपुढे लक्ष्मणाने लक्ष्मणरेषा ओढली होती, ती लक्ष्मण रेषा तिने ओलांडली व रामायण घडले.आजच्या स्त्रीलासुद्धा रूढी, परंपरेच्या लक्ष्मणरेषा ओलांडाव्या लागतात.परंपरावादी रावणांना सामोरे जावेच लागते.त्यास सामना करावा लागतो. सीतेला भूमीने कुशीत घेतले व तिची सुटका झाली.आजच्या स्त्रीबाबत असे घडत नाही.

निसर्गसहवासाचा परिणाम

निसर्गाच्या सहवासात स्वप्नमयतेचा अनुभव "असे कळावे" या कवितेत येतो. जेव्हा स्वप्नमयतेचा अंमल हळूहळू चढू लागतो त्यावेळी विचार धूसर होतो, निसर्ग-सौंदर्याची एवढी नशा चढविते की विवेकशक्तीचा विसर पडतो. वनराईची हिरवी मदिरा, मातीतून सुटणारा पक्षावनातील सुगंध, रात्रीमधले शततारांचे सूर स्वप्न आणि वास्तव यांच्यातील रेषा पुसून टाकतात आणि अकस्मितपणे स्वप्नातच पाऊल पडते.निसर्ग मानवी मनावर केवढी मोहिनी घालतो हे त्यातून स्पष्ट होते.

"आकाशवेडी" या कवितासंग्रहात काही दोष जाणवतात. आध्यात्मिक भाव व्यक्त करणाऱ्या कवितांमध्ये प्रत्येक वेळी कवयित्री चिंतनाच्या पातळीवर जातेच असे नाही. उदाहरणार्थ "शोध" या कवितेत पाखिपाखरा काय शोधतो आहे याचे स्पष्ट वर्णन येत नाही. तो पश्चिमवारा जे शोधतो आहे तसेच निळा पारवा आणि नायिका काय शोधत आहेत, याबाबत केवळ प्रश्नच उभे राहतात. उत्तराची दिशा नाही स्पष्ट होत नाही. त्याचप्रमाणे "ती" या कवितेत दुःख आणि मनाच्या मोहळातील मधा एकत्र येतात. दुःख संवेदना व मधातून व्यक्त होणारी सुखसंवेदना धराच्या संदर्भात येणे योग्य वाटत नाही.

आकाशवेडी अभिव्यक्तीदृष्ट्या विचार-

"आकाशवेडी" या काव्यसंग्रहातील कवितेची शीर्षकाची अन्वर्थकता ओळीच्या संख्येनुसार वर्गीकरण, अलंकार वैभव, विशेषणांचा व संस्कृत प्रचुर शब्दांचा कलात्मक उपयोग ही अभिव्यक्तीदृष्ट्या वैशिष्ट्ये जाणवतात त्यांचा क्रमाने विचार करावयाचे योजिले आहे.

शीर्षकाची अन्वर्थकता

"आकाशवेडी" या काव्यसंग्रहाच्या शीर्षकावरून या काव्य संग्रहातील कविता ह्या सौंदर्यवादी आहेत याची जाणीव होते. या कविता संग्रहातील कविता ह्या सौंदर्यवादाची वैशिष्ट्ये अधोरेखित करणाऱ्या कविता आहेत. धरतीवर राहून आकाशाचे स्वप्नांचे/ध्येयाचे। पूर्णत्वाचे। सुखाचे ईश्वरी सहवासाचे वेड कवयित्रीस असल्याचे जाणवते, म्हणूनच आध्यात्मिक भाव प्रकट करणाऱ्या कविता सर्वात जास्त म्हणजे ३२ एवढ्या आहेत.

या काव्यसंग्रहातील कवितांच्या शीर्षकाचा विचार केल्यास पुढील निरीक्षणे नोंदवता येतात.

१] काही कवितांची शीर्षके कवितेच्या पहिल्या ओळीत येतात.

उदा: दान-

" मागायचे असेल दान

तर आभाळापाशी माग" [पृ. १]

या ठिकाणी कवयित्री परमेश्वराजवळ दान मागित आहे हे आपणास पहिल्या दोन ओळीतच समजते

चाफ्याच्या झाडा

"चाफ्याच्या झाडा, चाफ्याच्या झाडा का रे आलास आज स्वप्नात ? [पृ. ७२]

इथे पहिल्या ओळीतील चाफ्याच्या झाडाच्या उल्लेखावरून ही कविता चाफ्याच्या झाडाविषयी आहे हे समजते.

भेट-:

"नेहमीच कशी आपली भेट ही पहिलीच भेट असते [पृ.४४]

यावरून या कवितेत भेटीमुळे निर्माण होणाऱ्या भावनांचे वर्णन असणार हे समजते.

पुढील कवितांची शीर्षकेही पहिल्या ओळीत येतात.

गणित, आज चंद्र झाले मन, उदास, काळोखाच्या सीमा, आम्ही महाराष्ट्र कन्या, आईपणाची भीती, आकाशवेडी, मध्येच आठवे, "अर्ध्या वाटेवर", पुन्हा पुन्हा मी खोल पहाते, "निळेभोर जळ खाली", या एकावन्नाव्या शरदात, "पौषामधली रात्र, मनाच्या मनात, एखादया वादळी रात्री, भेट कसे कळावे, पन्नाशीचा डोळा" स्वप्नमहाल, सारे शरीरच जेथे, नक्षत्रदर्शन, पत्र, आपणास रामप्रहरी, वेगळी, दोन वाजून वीस मिनिटे झाली तरी, ओढाळ मेघ, आताशी मी नसतेच इथे, तुझ्या संगती चालता, काळ न सांगतो, या रस्त्यावर, इतकी बेपर्वाई नजर, निळा पक्षी, लक्ष्मणरेषा, थोडी उरली आहे वाट.

SHIVAJI UNIVERSITY LIBRARY KOLHAPUR

२/- काही शीर्षके कवितेच्या दुस-या ओळीत येतात.

<u>धुणा:</u>

"किति अलगद पाऊल टाकति आले तरिही उठल्या धुणा" [पृ.३३]

"म्हणजे कितीही प्रयत्न केला तरी जे लपवायचे होते ते लपविता आले नाही. हे स्पष्ट होते.'

नवलाईचं फूल:

"कधी मधी माझ्या बागेत नवलाईचं फुल येतं [पृ. ९]

इथे कवयित्रीने फुलावर मानवी भावनांचा आरोप केला आहे. हे समजते. कारण नवलाईचे फूल हे मानवी भाव व्यक्त करते.

तास या कवितेच्या दुस-या ओळीत हे शीर्षक येते.

३] कवितांच्या मधल्या ओळीत काही शीर्षके येतात,

उदा- तेव्हाही पण

"तेव्हाही पण असेल माझ्या सुत्र प्रीतिचे हेच गळा " पृ.४७]

म्हणजेच पारलौकिकात जातानासुध्दा प्रीतिचे सुत्र गळ्यात असेल हा भाव व्यक्त होतो. पण, एस. ओ. एस या कवितांची शीर्षकेही मधल्या ओळीत येतात.

काही शीर्षके कवितेच्या शेवटच्या कडव्यात येतात.

चंद्रकोर -

येग माझ्या चंद्रकोरी!<br>
उजळाया माझे घर;<br>
माहेराच्या ममतेने<br>
उभे स्वागता सासर "[पृ. ३५]

या ठिकाणी चंद्रकोर म्हणजे सून हे समजते, तसेच या कवितेत सासूने सुनेच्या आगमनासाठी स्वागताची तयारी केल्याचे दिसते.

जखx
"जखम", ज वलय, आठवतं फक्त, आजमात्र, जेव्हा आठवतात, जपायचा एकटेपणा" या कवितांचे शीर्षके शेवटच्या कडव्यात आहेत.

पुढील शीर्षके शेवटच्या ओळीत येतात.

पुरावा:

"केवळ त्याच्या अस्तित्वाचा
तो आहे हा सबळ पुरावा" (पृ. ३१)

या ठिकाणी त्याच्या अस्तित्वाचा म्हणजे परमेश्वराच्या अस्तित्वाचा तो म्हणजे श्रद्धा हाच पुरावा आहे हे लक्षात येते.
ललाटरेषा, "दृष्टीला विसावा," नियतीचा वाटा," राधा, या सा-याहून वेगळा हस्तांदोलन, माझ्यासाठी" या कवितांची शीर्षक शेवटच्या ओळीत येतात व कवितेचा आशय स्पष्ट करतात.

काही कवितांचे शीर्षके ही कवितांमध्ये येत नाहीत; पण कवितेचा आशय स्पष्ट करतात.

उदा: विशेष

हा शब्द कवितेत कोठेही येत नाही मात्र रणांगणावर चाललेल्या आपल्या मुलास माता निरोप देते हा आशय त्यातून प्रकट होतो.

"अजिंठा"

या कवितेतही कुठेही शीर्षकाचा उल्लेख नाही; परंतु अजिंठा हे अप्रतीम असे लेणे आहे. त्याचे वर्णन कवितेत आहे हे कवितेच्या आशयातून व्यक्त होते. तसेच शिल्प, मागणे, शोध" या कवितांचा आशय शीर्षकातून व्यक्त होतो.

काव्यरचनेच्या दृष्टीने पुढील निरीक्षणे नोंदवता येतात.

SHIVAJI UNIVERSITY LIBRARY KOLHAPUR

ओळींच्या संख्येनुसार कडवी—

१) २ ओळींची ११ कडवी असणाऱ्या कविता

"नियतीच्या वाटा"

२) ३ ओळींची ६ कडवी असणाऱ्या कविता

"अर्ध्या वाटेवर"

४ ओळींची २ कडवी असणाऱ्या कविता

"जखम"

४ ओळींची ३ कडवी.

"निळेभोर जळखाली", दान, वैशाखमासी", आणि ~~४ ओळींची ४ कडवी~~.
४ ओळींची ४ कडवी –

आज चंद्र झाले मन, उदास काळोखाच्या सीमा, सप्रेम प्रणाम," आळ रांगतो, तुझ्या संगती यावया, जपावया एकटेपणा."

४ ओळींची ५ कडवी असणाऱ्या कविता,

"भरली ओंजळ जड होते," राधा"

"आकाशवेडी", सायुज्य" चंद्रकोर, " सारे शरीरच जेव्हा,

४ ओळींची ६ कडवी असणाऱ्या कविता.

"आज आत्मा"

४ ओळींची ७ कडवी असणाऱ्या कविता.

"नवलाईचं फूल, आम्ही महाराष्ट्र कन्या,"

निरोप.

४ ओळींची ९ कडवी असणाऱ्या कविता,

"आईपणाची भीती", "वलय"

४ ओळींची १० कडवी असणाऱ्या कविता,

"ललाटरेषा"

SHIVAJI UNIVERSITY
LIBRARY
KOLHAPUR

ओळींच्या संख्यानुसार कविता-

१३ ओळींची कविता,

"नजर"

४ ओळींच्या कविता

"खुणा", निळा पक्षी"

५ ओळींच्या कविता,

"ओढाळ मेघ."

६ ओळींच्या कविता,

"ताण."

७ ओळींच्या कविता,

"हस्तांदोलन, "लक्ष्मणरेषा."

८ ओळींच्या कविता,

"मध्येच आठवे", पुरावा, "शोध, "

तेव्हाही पण, "नक्षत्रदर्शन."

९ ओळींच्या कविता

"माझ्यासाठी."

१० ओळींच्या कविता

"पुन्हा पुन्हा मी खाली पाहते," शिल्प",

"स्वप्नमहाल," अजिंठा", कसे कळावे.

१२ ओळींच्या कविता,

"दृष्टीला विसावा", भेट, रात्र अशी भिजलेली,"

१३ ओळींच्या कविता,

एस. ओ. एस.

१४ ओळींच्या कविता,

"या एक्कावन्नाव्या शतकात, मनाच्या मनात, मागणे.

१५ ओळींच्या कविता

"इतकी बेपर्वाई."

१६ ओळींच्या कविता

"या सा-यांतून मैदान", पत्र," वेगळी.

१७ ओळींच्या कविता,

"श्रावणातल्या रामप्रहरी"

१८ ओळींच्या कविता,

"क्वचित क्वचित, "ती .

१९ ओळींच्या कविता,

"पौषामधली रात्र", आठवतं फक्त.

२० ओळींच्या कविता

"जेव्हा आठवतात"

२२ ओळींच्या कविता

"पन्नाशीचा डोळा"

२३ ओळींच्या कविता

"आताशी मी नसतेच इथे"

२४ ओळींच्या कविता,

"चाफ्याच्या झाडा"

२५ ओळींच्या कविता

"उडते निद्रा."

२७ ओळींच्या कविता

"दोन वाजून वीस मिनिटे झाली तरी.

२९ ओळींच्या कविता,

"* गणित.

३० ओळींच्या कविता

" एखादया वादळी रात्री. "

ही ओळींची विविधता कवयित्रीचा मूड, त्या त्या विषयांवरील चिंतन हे घटक अप्रत्यक्षपणे सूचित करते.

या कवितात सुवर्णकळस, झुलाजल [पृ. १८], कातरमन [पृ. ४९], मंदिर सचेतन आठवणी [पृ. ५१], ओघळ मेघ [पृ. ५५], अशा प्रतिमा येतात पण या प्रतिमा वर्णनाच्या पातळीवर राहतात. त्यामुळे प्रतिमांच्या पसरटपणा ही एक उणीव या कवितेत जाणवते. या संदर्भात ल. ग. जोग म्हणतात, "कवयित्री हळवेपणाच्या अतिरेकी आविष्कार करीत राहते. केव्हा केव्हा सर्वच कविता वर्णनाच्या पातळीवर [descriptive level] वर रेंगाळत राहते.

उदा: "क्वचित क्वचित", ही जडभारी कविता पहावी. ही कविता शेवटच्या दोन ओळीमुळे केवळ वर्णनपर उरत नाही. "स्वप्नमहाल" ही कविता तर "कुणीतरी ओठांनीच माझे डोळे झाकले, हे सांगण्यापूर्वी सात दारे, सात रंग, सात पाकळ्या सांगून [सप्तपदी १], "एकांत न्हाले" दुस-यात गुरफटले, तिस-यात "अमृताचे न्हाले पुढे आले वगैरे याची येत राहते. पुन्हा पुन्हा येणा-या प्रतीमांचा हा पसरटपणा त्यांच्या कवितेतील एकप्रकारची उणीव म्हणावी लागेल.[2]

## अलंकार वैभव

अभिव्यक्ती दृष्टीने अलंकारांचा विचार करणे क्रमप्राप्त आहे. अलंकारांमुळे अभिव्यक्ती अधिक स्पष्ट होते, तर भाषेला सौष्ठव प्राप्त होते. अलंकाराच्या वापरामुळे मूळ सौंदर्याची खुलावट अधिक होते.

यमक:

या काव्यसंग्रहात कवयित्रीने यमकाचा वापर मोठ्या प्रमाणात केला आहे. बहुतेक सर्व ठिकाणी एकाहारी अन्त्य यमक साधले आहे.

"आम्ही महाराष्ट्र कन्या"

"म्हणा कळ्या या जाईच्या
परी मायभूमीसाठी
करु हातांचीहि ढाल
भाळ आंधळूनिया पाठी" [पृ. ११]

SHIVAJI UNIVERSITY LIBRARY KOLHAPUR

"साठी पाठी" या दोन शब्दात यमक साधला आहे. त्यामुळे आशय अधिक समर्थपणे व्यक्त झाला आहे. मायभूमीसाठी पाठी पाळ बांधून लढू हा निश्चय त्यातून स्पष्ट होतो.

आक्रमणाची भीती:

"जळी, स्थळी, आकाशीही
अणुबॉम्ब झाकला आहे.
प्रत्येक रस्ता माणसाच्या
रक्ताने रे माखला आहे", (पृ. १६)

येथे "आहे,- आहे " या दोन शब्दामध्ये यमक साधले आहे. दोन्ही शब्द मात्र वेगवेगळ्या संदर्भात वापरले आहेत. पहिल्या आहेमुळे अणुबॉम्बची व्यापकता स्पष्ट होते, तर दुसऱ्या आहे मुळे त्याचे परिणाम स्पष्ट झाले आहेत.

राधा-" नाही राधापण सोपे
जीव झोकावा पुरात
लागे अनय सोसावा
उभा जन्म संसारात" (पृ. १२)

या ठिकाणी, "पुरात- संसारात" या दोन शब्दांनी आशयाची व्याप्ती वाढविली आहे. राधापण मिळविण्यासाठी जीव घेणे धाडस करावे लागते, तसेच संसारामध्ये त्रासही सहन करावा लागतो हा आशय ठळकपणे स्पष्ट होतो.

जखम:

"वार झेलला तसाच
हार कां घेलावा?
भार हुंदके असला,
का निमूट सोसावा?" (पृ. २७)

"पैलांचा सोसावा" या दोन शब्दांत यमक साधले आहे. या दोन शब्दांमुळे पराभव स्वीकारावाच काहीं व त्यामुळे वाढणारा भार सोसावाच का? हा आशय स्पष्ट होतो.

याच प्रकारचे यमक निळेभोरे, जळलाली, सायुज्य, उदास काळोखाच्या सीमा, ललाटरेखा, दान, चंद्रकोरे, वलय, आजमात्र, सारे शरीरच जेव्हो, प्रेम प्रणाम, काळ रांगतो, तुझ्या संगती, यावया, जपायचा एकटेपणा, थोडी उरली आहे. वाट या कवितांमध्ये आहे.

सलग दोन ओळीत शेवटच्या शब्दातही यमक साधले आहे.

नियतीच्या वाटा:

---

"मंदिरास त्या जायासाठी असतिल हजार वाटा माझा मार्ग गवसला अग्निपथा हा नियतीच्या वाटा"

"वाटा- वाटा" या शब्दांमध्ये यमक आहे. पहिल्या "वाटा" म्हणजे परमेश्वराच्या मंदिराकडे जाणाऱ्या वाटा व दुसऱ्या "वाटा" म्हणजे नियतीचा मार्ग हा आशय स्पष्ट होतो.

क्वचित क्वचित-:

तांबडया मातीत तांबडया विटांची जशी की माहेरवाट छोटयाशा बागेला छोटयाशा ओटयाला आपलेपणाचा घाट"

"वाट - घाट" हे दोन शब्द आशय व्यक्त करतात. पहिल्या शब्द वाटेचे वर्णन करतो, तर दुसरा आपलेपणाचे स्वरूप स्पष्ट करतो. अशा प्रकारचे यमक ती, भेट, कसे कळावे, स्वप्नमहाल, वेगळी, रात्र अशी भिजलेली, ओढाळ मेघ, निळा, पक्षी, अंजिठा या कवितेत आहेत.

-शब्दालंकाराप्रमाणे अर्थालंकाराचेही उपयोजन कवीने केले आहे.

"या एकावन्नाव्या शरदात" - ~~पृ. ३१~~

"- तरीहि आठवतात ते तेच मऊ फुलेले सुकलेले कळीच्या फुलासारखी सुकूनही दरवळलेले (पृ.३१)

बकुळीच्या फुलासारखी या शब्दामुळे तारुण्यातील धारण करे होते ते स्पष्टपणे सांगितले आहे. व त्यामुळे त्या धारणांची महती पटते

"आज मात्र"

दोन टोकावर दोघे
मध्ये अबोलकी उब;
दोन किना-यात जसा
एक शब्दातील लोभ" [पृ. ४९]

या ठिकाणी दोन किना-यात जसा एक शब्दातील लोभ असतो तशी दोन टोकावर असणा-या आपणा दोघात अबोलकी उब आहे. अबोलक्या उबेला शब्दातील लोभाची उपमा दिलेली आहे.

स्वभावोक्ती:
---------

"पुन्हा पुन्हा मी खोल पाहते"-
"तशीच ताजी, प्रसन्न पुष्पे आणि धूतवसना तशीच आहे.
भावपुरंध्री अचल ध्यानमग्ना". [पृ. २९]

शुभ्र वस्त्रे परिधान केलेली प्रेमाची तपश्चर्या करणारी नायिका येथे हुबेहुब व्यक्त केलेली आहे.

उत्प्रेक्षा:-

"श्रावणातल्या रामप्रहरी "
"तारेत अडकलेल्या वटवाघुळीला टोच्या मारतो कावळा बुभुक्षित मळामली गालिचावर जणू धुकून पडलेला शाईचा ठिपका बटबटीत" [पृ. ५६]

वटवाघुळीला टोचा मारणारा बुभुक्षित कावळा जणू शाईचा बटबटीत ठिपका आहे. श्रावणातील रामप्रहराच्या सौंदर्याला [illegible]णारा

SHIVAJI UNIVERSITY LIBRARY KOLHAPUR

या उपमेने अधिक परिणामकारकपणे रसिकांसमोर येतो.

प्रश्नालंकार:

"ललाटरेखा"

नुपुरातल्या घाग-यांसाठी
वेचला म्हणतोस एकेक प्राण
काय होतो अपेक्षा तुझी ?
ऐकली नाहीस का ? स्पंदणारी ? (पृ.४)

या ठिकाणी नायिकेने नायकास प्रश्न विचारले आहेत व त्यामुळे तिच्या मनातील भाव स्पष्ट झाला आहे.

"नवलाईचं फूल"

"केव्हा तरी पाखरू होऊन
का त्याच्याशी बोलत नाही ?
गंभीर मौन सोडून
वेल्हाळ का होत नाही ? (पृ.१)

या ठिकाणी प्रश्न विचारून कवितेचा आशय व्यक्त केला आहे. अशा प्रकारचा प्रश्नालंकार पुढील कवितांमध्ये आहे. आईपणाची भीती, जखम, वलय, शोध, या सा-यांहून बेभान, आठवतं फक्त, स्वप्नमहाल, आताशी मी नसतेच इथे, चाफ्याच्या झाडा, इतकी बेपर्वाई.

विशेषणांचा कलात्मक उपयोग:

"आकाशवेडी" या काव्यसंग्रहात विशेषणांचा वापर कल्पकतेने केलेला आहे. त्यामुळे कवयित्रीच्या मनातील कल्पना चांगल्याप्रकारे स्पष्ट झाली आहे.

काही विशेषणे-

सोनसळी कांति- सोनसळी या विशेषणामुळे कांति कसली ते समजते व विशिष्ट असे स्वरूप स्पष्ट होते.

मोती झालर:- मोती या विशेषणामुळे झालर कसली ते समजते.

सावळे मेघ -: सावळे हे विशेषण त्यामुळे मेघ कसे आहेत ते समजते.

वरदानोत्सुक लोचन -: वरदानोत्सुक हे विशेषण आहे त्यामुळे लोचन कसे होते ते कळते.

महामली गालीच्यावर :- महामली हे विशेषण महामली या शब्दामुळे गालिच्याची व्याप्ती वाढते.

रखरखीत जमीन:- रखरखीत हे विशेषण त्यामुळे जमीन या शब्दाची व्याप्ती वाढते व आशय स्पष्ट होतो.

निरभ्र आकाश:- निरभ्र हे विशेषण त्यामुळे आकाशाचे स्वरूप समजते व मनातील भावही समजतात.

पोरका आनंद-: पोरका हे विशेषण त्यामुळे आनंद कसा ते समजते.

संस्कृतप्रचुर शब्दांची समर्पक योजना

"आशावेडा" या काव्यसंग्रहात संस्कृतप्रचुर शब्दांचा वापर केला आहे. त्यामुळे आशय स्पष्ट करणे सुलभ झाले आहे. संस्कृतप्रचुर शब्द उदाहरणार्थ, नूपुर, पंचप्राण, अस्त, जीर्ण, शांत, दिन, मूर्ती, इत्यादी हे शब्द कवितेतील वातावरण अधिक प्रसन्न करतात.

SHIVAJI UNIVERSITY
LIBRARY
KOLHAPUR

पदमा गोळे यांच्या कवितेच्या आशय, अभिव्यक्तीची वैशिष्टयेआपण पाहिली. या कवितेविषयी प्रा. निशिकांत ठकार म्हणतात," दुजाचे भान, मला नाही, अशी मी एक आकाशवेडी पक्षीण आहे. असं म्हणणारे त्यांचे मन स्वप्नवेडे आहे. पण हळूहळू ते नियती, मानवी, जीवनाला वेढणारा मृत्यू, आसक्ती, निरासक्ती, याबद्दल चिंतन करते. हे चिंतन खोल नाही. त्यामुळे त्यांची कविता ही विधानवजा होऊ लागलेली आहे. "नियतीने करायला लावले ते मी निमूट केले", "घर हे घर उरतच नाही", " याचे देणे त्याचे देणे हिशेब किती करावा?" "आधीच पायांनी माप मांडले होते" इत्यादी विधाने सापडतील. प्रीतिपथावर ते आकाशवेडी हा कवितेचा प्रवास म्हणजे स्वप्नवेडया आत्मकेंद्रीत स्त्रीचा प्रवास आहे.[४]

असे असले तरी प्रायः पारंपारिक असणाऱ्या या कवितेत "नवे ही काही आहे. त्याबाबत प्रा. ल. ग. जोग म्हणतात", आज चंद्र झाले मन, किंवा [मन] असे फुले, शेव नभाचा पुरेना" या ओळी पृ. वर भेटतात, तर" अर्ध्या वाटेवर, आवडतो देखणा गुलमोहर "पृ. २५ वर फुलतो, पृ. ५१ वर सुगंधित धुक्याची विस्मित पहाट" उभी आहे पृ. ६२ वर जाई जुई, म्लानमुखी आर्तश्वास सोडतात, रात्र भिजलेली असते. पहाट न्हालेली असते.; तर ७२ व्या पृष्ठावर "चाफ्याच्या झाडा, चाफ्याच्या झाडा, का बरं आलास आज स्वप्नांत, असे कवयित्रीचे मन प्रश्न करते आहे. सर्व संग्रहातून हाच पारंपारिक, सांकेतिक हळूवार संवेदनांनी सदा--फुलीसारखा फुलणारा दृष्टीकोण वाचकाच्या प्रत्ययास येतो. विशेष म्हणजे कस्तूरीचा जसा एकच सुगंध तसा साऱ्या कवितांना ह्या निसर्ग प्रतीकांचा एकच एक सुगंध जडलेला. त्यामुळे हा संग्रह कमीअधिक प्रमाणात " पुनरुक्त... वाटत

SHIVAJI UNIVERSITY LIBRARY KOLHAPUR

राहतो. मग बेहोश परिस्थितीची धुंद झोप असली, तरी आकाश, उषा, छा, अरुण इत्यादींनी त्यात रंग भरलेले असणार.; एक्कावन्नाव्या शरदांतही बकुळफुले, आषाढघनांचे, ग्रीष्मवादळे, फुले ढाळणारा पारिजात ह्यांचेच अस्तित्व श्रावणातल्या रानझुडपी "नहो प्रसन्न भाऊ, केशरी रंगाने भारणारे पपये " हे भास नवे आहेत. ] सांवळे मेघ, गुलाबाचे ताटवे, ओळीओळींनी दिसू लागतात. भावनेशी समांतर प्रतिमा अपरिहार्यपणे निसर्गातूनच घेण्याची कवयित्रीची वृत्ती थोडीफार बालकवीसारख्या सौंदर्यभक्त कवीच्या जातीची आहे. म्हणूनच हा संग्रह त्या दृष्टीने जुन्या पारंपारिकतेशी जुळणारा आहे. कविता नवीन असली तरी ती "जुने", सौंदर्य व्यक्त करणारी आहे. यातील आशयाबद्दल मात्र तसे पटकन म्हणता येणार नाही, कारण तोंण" ह्या छोट्याशा कवितेत असलेल्या अस्पष्ट अमूर्त भाववृत्तीमुळे वाचकावाचकात वेगवेगळी अनुभववलये निघू शकतील हे त्याचे नवेपण, "ह्या सा-यांहून बेभान" मधील धुंदीपणा.; नक्षत्रदर्शन" मधील पारंपारिकतेवर गूढत्वाचे केलेले कलम "नजर" मधील अल्पाक्षरता, थोडी उरली आहे वाट " मधील सुखात्मक भूतपण भविष्यकालीन आशंका, या सा-यांमुळे ही पारंपारिकता थोडी सहज होते थोडी "नवी" होते. " युग्म

वरील सर्व विवेचनावरून आपणास पुढील काही निरीक्षणे नोंदवता येतात.

१ ] "आकाशवेडी" विशिष्टता या काव्यसंग्रहाची आध्यात्मिक भाव, प्रेमभावाची कुटुंबवत्सलता, वात्सल्यपरता, निसर्गाची ओढ, चिंतनपरता, देशभक्तीचे दर्शन, आत्माविष्कारपरता ही आशयसूत्रे आहेत.

२ ] आध्यात्मिक भाव हे आशयसूत्र आगळे दान आत्मपरीक्षणातून येणारी निराशा, सुखदु:खाचा अंदाज, श्रेयसाची ओढ, प्रेयसाकडून श्रेयसाकडे वाटचाल, अलौकिकाचा ध्यास, बदलती दृष्टी, स्थितप्रज्ञेकडे वाटचाल, मनामनाचे मीलन

आत्मपरीक्षण, हरपल्या श्रेयाचा शोध, स्मृती उत्सव, संकेताचे उपयोजन, समजूतदार पहाटवारा, स्वत्वाचा शोध, तटस्थ वृत्ती, सुखदु:खाचे द्वंद्वात्मक दर्शन, ईश्वरी अस्तित्वाचा प्रश्न, प्रियकर हेच आकाश, चिंतनसन्मुखता, निसर्गातील चैतन्यतत्व, श्रेयसाची मुद्रा, सुरक्षितपणा हाच शाप, मनस्विनीची जीवनधारणा या घटकांनी स्पष्ट झाला आहे.

३) प्रेमभाव या आशयसूत्राचे घटक प्रेम साफल्याची ओढ, साफल्याविण, उत्कट प्रेम, प्रतीक्षा करणारी प्रीती, तृप्त प्रेमभाव, श्रेष्ठ प्रेमाची अतूट प्रीती हृद्गत ऐकणारे प्रेम, सुरांतून प्रीतीचा अविष्कार, एकटेपणा नाहीसे करणारे प्रेम, प्रेमातील अमरत्व, स्वप्नमय, प्रेम, सांकेतिक प्रेम, दु:खमय प्रेम, पत्रातून व्यक्त होणारे प्रेम, प्रीतीचा स्मरणोत्सव, ओढाळ, प्रेम, भित्रे पण धीट होऊ पाहणारे प्रेम, प्रेमातील कृतज्ञता, संकेताविण भेटणारे प्रेम ही आहेत.

४) कुटुंबवत्सलता हे आशयसूत्र आदर्श गृहिणी, गृहिणीचे प्रेम, सुनेचे स्वागत, स्त्रीजीवनातील दु:ख या अंगाने स्पष्ट झाले आहे.

५) वात्सल्यपरता हे आशयसूत्र प्रेरणादायी संस्कार, कृतज्ञताव वात्सल्यात रममाण, होण्याची वृत्ती या घटकाने स्पष्ट झाले आहे.

६) निसर्गाची ओढ हे आशयसूत्र निसर्ग -कौटुंबिक जीवनाचे रूप, निसर्गाशी एकरूपता, तरलपणाची ओढ, बालपणीची स्वप्नमयता, निसर्ग कलाकृती एकरूपता या अंगाने स्पष्ट झाले आहे.

७) चिंतनपरता हे आशयसूत्र परमेश्वराशी एकरूप होण्याची वृत्ती, घरातील माणसांचे वेगळे वर्तन, निळ्या रंगाची ओढ, स्वप्नमयता या घटकांनी व्यक्त झाले आहे.

८) देशभक्तीचे दर्शन हे आशयसूत्र मराठी अस्मिता व आईचा उपदेश या घटकाने व्यक्त झाले आहे

९) आत्माविष्कारपरता हे आशयसूत्र वास्तवाचा वेध, लढाऊ वृत्ती, स्त्री बंधनाची दाहक जाणीव, निसर्गसहवासाचा परिणाम या अंगाने स्पष्ट झालेले आहे.

१०) या कवितांमध्ये चिंतनाच्या पातळीवर जाताना वर्णनपरता येते. तसेच सुख-संवेदना व दुःख संवेदना यांच्यातील संबंध नीट स्पष्ट होत नाही.

११) अभिव्यक्तीच्या दृष्टीने शीर्षकाची अन्वर्थकता, ओळींच्या संख्येनुसार कवितांचे वर्गीकरण, अलंकार वैभव, विशेषणांचा कलात्मक उपयोग व संस्कृतप्रचुर शब्दांची समर्पक योजना ही वैशिष्ट्ये आढळतात.

SHIVAJI UNIVERSITY LIBRARY KOLHAPUR

प्रकरण ४ थे संदर्भ


१] पोतदार अनुराधा " सहकंप" पुणे १९८३, पृ. ६१-६२

२] Hornby. A. s. "Oxford Advanced Learner's Dictionary of Current English". Londen, 1974 P-839.

३] जोग ल.ग. " आकाशवेडी" समाविष्ट, आलोचना, जुलै १९६१ पृ. ५-६

४] ठकार निशिकांत, " मराठी कविता, स्वरूप आणि विवेचन "पुणे १९७७ पृ. ३३०

५] उ. नि. पृ. ३ व ४


SHIVAJI UNIVERSITY LIBRARY KOLHAPUR